| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २०७ वा | बुधवार दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### लाथाबुक्यांनी, चाकु व पट्टाने मारहाण करुन लुटले

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सतिष विरनाथ बिडवे, वय ४७ वर्षे, रा. बॅक कॉलनी शाहीर नगर दपका एम. आय. डी. सी. शेजारी निलंगा ता. निलंगा जि. लातुर हे दि. २५.१०.२५ रोजी कुटुंबासह त्यांची इर्टीका कार ने पंढरपुरला जात असतांना फिर्यादीच्या पुतणीस उलटी होउ लागल्याने कार रोडलगत उभी केली असता चार अनोळखी इसमांनी लाथाबुक्यांनी, चाकु व पट्टाने मारहाण करुन व त्यांचे व पत्नी व भावजय यांचे ५७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे लिंग व रोख रक्कम ७,००० असे एकुण २,२०,००० किंमतीचे जबरदस्तीने काढुन घेतले. तसेच संदीप रघुनाथ आटोळे, वय ४२ वर्षे, रा. बरड ता. फलटण जि. सातारा यांची पत्नी व मुलगी असे शेजारी राहणारे कोमल मंगल देवडे व त्यांचे कुटूंब असे तुळजाभवानीचे दर्शनासाठी येत असताना सिंदफळ गावाचे बोर्डाच्या पढे आले असता त्यांनीही गाडी रोडलगत ०३.१५ वा. थांबवली असता चार अनोळखी असमांनी दोन मोटरसायकलवर येवून चाकुचा व कट्टा सदृश वस्तुचा धाक दाखवून त्यांचे गाडीमधील दागिने जबरीने काढून नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सतिष बिडवे यांनी दि.२५.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९(६), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोलार प्लेटाची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुनिल जगन्नाथ सावंत, वय ४२ वर्षे, रा. मस्सा खं ता. कळंब जि. धाराशिव यांचे मस्सा खं शेत गट नं ९०९ मधील अलटेक एनर्जीज कंपीनच्या सहा सोलार प्लेटा एकुण२०,०० किंमतीच्या अज्ञात व्यक्तीने दि.१८.१०.२०२५ रोजी ०६.०० ते दि.१९.१०.२०२५ रोजी ०९.०० वा. सु. चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुनिल सावंत यांनी दि.२५.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### बसमध्ये चढताना सोन्याच्या दागिण्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी पुजा विशाल पिंगळे, वय २५ वर्षे, कासार वडवली कालिकामाता मंदीर ठाणे घोडबंदर रोड मुंबई या दि.२५.१०.२०२५ रोजी बसस्थानक धाराशिव येथे धाराशिव ते ठाणे बसमध्ये चढत असताना अनोळखी महिलेने गर्दीचा फायदा घेवून फिर्यादीचे पर्स मधील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अंदाजे २६,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी पुजा पिंगळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पाणी पातळी वाढीसाठी अटल भूजल योजना ठरते वरदान!

### लोकसहभागातून जिल्ह्यात प्रभावी भूजल व्यवस्थापन

धाराशिव, (जिमाका)- केंद्र शासन व जागतिक बँक अर्थसहाय्यित अटल भूजल योजना सन २०२० पासून महाराष्ट्रासह धाराशिव जिल्ह्यात यशस्वीपणे राबविली जात आहे.

या योजनेअंतर्गत धाराशिव तालुक्यातील ५० आणि उमरगा तालुक्यातील ५ अशा एकूण ५५ गावे निवडण्यात आली असून ही गावे अतिशोषित,शोषित व अंशतः शोषित पाणलोट क्षेत्रात मोडतात.भूजलाच्या अनियंत्रित उपशामुळे भूजल पातळी खालावणे व पाण्याची गुणवत्ता बाधित होणे या समस्येवर उपाय म्हणून लोकसहभागातून मागणी व पुरवठा आधारित भूजल व्यवस्थापनाचे सूत्र राबविणे हा योजनेचा मुख्य हेतू आहे.

**योजनेची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये**

भूजल साठ्याची शाश्वतता राखण्यासाठी जलसंधारण व भूजल पुनर्भरण,पाणी बचत,सूक्ष्म सिंचन पद्धतीचा अवलंब,पिक पद्धतीत बदल,तसेच राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचे अभिसरण यावर भर देण्यात आला आहे.या योजनेंतर्गत गावातील प्रत्येक शेतकऱ्याला १०० टक्के सूक्ष्म सिंचन स्वीकारण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे.

**महिलांचा सहभाग**

या योजनेच्या शेवटच्या टप्प्यात देखभाल,दुरुस्ती व निर्गमन प्रक्रिया सुरु असून महिलांचा सक्रिय सहभाग विशेषत्वाने नोंदविला गेला आहे. पर्जन्यमापक,पिझोमीटर (DWLR), निरीक्षण विहिरी,वाटर फ्लो मीटर यांसारख्या साधनांद्वारे भूजल पातळीचे मोजमाप करण्यात येत आहे.तसेच ग्रामपाणी व स्वच्छता समित्या व ग्रामपंचायत प्रतिनिधींची क्षमता वाढविण्यासाठी सातत्याने प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

**भूजलमित्र बनले जलसैनिक**

प्रत्येक ग्रामपंचायतीतील १० भूजलमित्र गावपातळीवर भूजल मोजमाप,पर्जन्यमान निरीक्षण, विहिरींचे परीक्षण,उपसा मोजमाप यासारखी जबाबदारी पार पाडतात. या माध्यमातून लोकसहभागावर आधारित जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.

**जनजागृतीसाठी उपक्रम**

प्रत्येक गावात स्वागत फलक,म्हणी रंगवणे,प्रशिक्षण,प्रभात फेरी,शालेय स्पर्धा,ग्रामसभा,महिला बचत गटांना देशी बियाणे वाटप,शेतकरी मेळावे, यशोगाथा सादरीकरण व माहितीपत्रक वितरण अशा माध्यमातून जागरूकता निर्माण केली गेली.

## तुळजापूर लवकरच रेल्वेच्या नकाशावर..
## परिवहनमंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक

धाराशिव/मुंबई (प्रतिनिधी)-मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सोलापूर - तुळजापूर - धाराशिव या ३२९५ कोटी रुपयांच्या नव्या रेल्वे मार्गाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.त्यामुळे लवकरच तुळजापूर हे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या नकाशावर येणार आहे.याचा फायदा महाराष्ट्रातील आणि संपूर्ण भारतातील आई तुळजाभवानीच्या भावी प्रवाशांना होणार आहे अशी माहिती पालकमंत्री तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की,केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त भागीदारीतून सुमारे ९६ किमी लांबीचा ब्रॉडगेज लोहमार्ग तयार करण्यात येणार असून राज्य शासनाचा या प्रकल्पात निम्मा वाटा आहे.या लोहमार्गामुळे श्री क्षेत्र पंढरपूर बरोबर तुळजापूर देखील रेल्वेच्या नकाशावर येणार आहे.



दरवर्षी लाखो भाविक - पर्यटक आई तुळजाभवानी दर्शनासाठी तुळजापूर येथे येत असतात.तसेच हा लोहमार्ग धाराशिव जिल्ह्यातुन जात असल्यामुळे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यास देखील मदत होणार आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)-ढोकी पोलीस ठाणे अंतर्गत समाबाई रा.दत्तानगर पारधीपिढी ढोकी ता. जि. धाराशिव या दि.२७.१०.२०२५ रोजी १३.५० वा. सु ढोकी ते तेरणा कारखाना जाणारे रोडच्या बाजूला वस्तानगर कब्रस्थान जवळ ढोकी येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर सुनिता रा.पारधीपिढी तेर ता. जि. धाराशिव या दि.२७.१०.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरा समोर अंदाजे १,४४० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द ` ढोकी पो ठाणे येथे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

आनंदनगर पोलीस ठाण अंतर्गत उज्वला रमाईनगर धाराशिव ता. जि. धाराशिव या दि.२७.१०.२०२५ रोजी रमाई उड्डाण पुलाजवळील एम.आय.डी. सी. धाराशिव येथे अंदाजे २,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १०सिलबंद बाटल्या व १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा आनंदनगर पो ठाणे येथे येथे गुन्हा नोंदविला आहे.

शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत शालुबाई रा. शिराढोण पारधी पिढी ता.कळंब जि. धाराशिव हे दि.२७.१०.२०२५ रोजी एकुरगा शिवारातील झोपडीचे पाईमागील बाजूस अंदाजे २,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या व २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द ` शिराढोण पो ठाणे येथे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## मोटार सायकल चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात
## चार मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस ....

धाराशिव (प्रतिनिधी)- स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक हे धाराशिव जिल्ह्यातील अभिलेखावरील गुन्हे उघडकीस आणणेकामी रवाना होवून कळंब येथे आले असता पथकास माहिती मिळाली की, दोन इसम चोरीच्या मोटारसायकल विकत आहेत. प्राप्त झालेल्या माहितीवरुन तात्काळ नमुद इसमाचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेवून चोरीच्या मोटारसायकल बाबत विचारणा केली असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांना विश्वासात घेवून विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या अन्य एका साक्षीदारासह चोरुन आणलेल्या मोटारसायकल त्यांच्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या ताब्यात एकूण ०४ मोटारसायकल मिळून आल्या. धाराशिव जिल्हा गुन्हे अभिलेख तपासला असता नमुद मोटारसायकल या पोस्टे आनंदनगर, तुळजापूर, येरमाळा व मुरुड जिल्हा लातूर हद्दीतुन चोरीस गेल्या असल्याचे दिसून आले. नमुद दोन आरोपींना तसेच ०१,५५,००० रु किमतीच्या एकूण ०४ मोटार सायकल सह ताब्यात घेवून त्यांना पुढील कारवाईस्तव पोस्टे हजर करण्यात आले. आहे. ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव अर्जुन साहेबराव काळे वय २९ वर्ष रा. वाकडी पारधी पिढी ता. कळंब जि. धाराशिव तर नितीन विश्वास शिंदे वय २५ वर्ष रा नांदूर ता



केज जि बीड ह. मु. मांडवा ता वाशी जि धाराशिव असे असून त्याचेकडून एकुण ०४ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून पोलीस त्याचे अन्य साथीदाराचा शोध घेत आहेत.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर व . अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार,पोहेका शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फरहान पठाण, चापोका रत्नदीप डोंगरे, नागनाथ गुरव यांच्या पथकाने केली आहे.

## सहाय्यक आयुक्तपदी गौरवपूर्ण नियुक्ती झाल्याबद्दल कु. संदीप पाटील यांचा नितीन काळे यांच्या हस्ते जाहीर सत्कार..




जळकोट (विजय पिसे)- महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये मौजे राघूचीवाडी ता.जि. धाराशिव येथील सुपुत्र कु. संदीप शोभा रमेश पाटील यांची सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग या प्रतिष्ठित पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल भारतीय जनता पार्टीचे मा. जिल्हाध्यक्ष श्री. नितीन काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभाप्रसंगी बोलताना श्री. नितीन काळे म्हणाले की, संदीप पाटील यांची ही नियुक्ती तरुणांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या या यशातून त्यांची जिद्द,चिकाटी व कठोर परिश्रमाचे दर्शन घडते. त्यांच्या मेहनतीने त्यांनी जिल्ह्यामध्ये नवे उदाहरण निर्माण केले आहे. त्यांच्या वडिलांनी दूध विकून मुलाला शिक्षण दिले आणि आपल्या वडिलांचे श्रम मुलाने सार्थक ठरविले. येणाऱ्या काळात कु. संदीप पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अशाच प्रकारे जिल्ह्यातील युवक आपल्या कठोर परिश्रमातून विविध क्षेत्रांमध्ये यश संपादन करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढतील, असा आशावादही श्री. नितीन काळे यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी भविष्यातील वाटचाली संदर्भात शुभेच्छा देऊन अभिनंदनही केले. संदीप रमेश पाटील हे आपल्या प्रशासकीय सेवेतून समाजातील वंचित दुर्बल घटकांच्या प्रगती व उन्नतीसाठी ते नक्कीच मोलाचे योगदान देतील, असा विश्वास यावेळी भारतीय जनता पार्टीचे मा. जिल्हाध्यक्ष श्री नितीन काळे यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष ॲड. खंडेराव चौरे,सहाय्यक पोलीस निरीक्षक मारुती करवर, दत्ता पेठे, शंकर मोरे, दत्ता करवर, पोपट करवर, ज्ञानदेव करवर, जगन्नाथ नलावडे, दशरथ यमगर, संदीप करवर, गौतम पाटील, ज्ञानदेव भूनवर, दर्लिंग बेलदार, तानाजी करवर, धनंजय पाटील, रमेश पाटील,अमित बंडगर, दीपक बंडगर, शरद पाटील, श्रीकांत करवर, अनंत करवर यांच्यासह महिला, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना: अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत

धाराशिव (जिमाका)- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे.या योजनेचा उद्देश म्हणजे शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण पुढे चालू ठेवण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळावे,हा आहे.

या योजनेअंतर्गत इयत्ता ११ वी, १२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भोजन भत्ता, निवास भत्ता आणि इतर शैक्षणिक सुविधा स्वखर्चाने उपलब्ध करून घेण्यासाठी शासनाकडून मदत दिली जाते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णयानुसार ही योजना आता तालुकास्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२५ -२६ करिता अर्ज सादर करण्याची प्रक्रिया https://hmas.mahait.org या पोर्टलवर सुरू करण्यात आली आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज सादर केलेले पण प्रवेश न मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी या पोर्टलवर स्वाधार योजनेसाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा. अर्ज केल्यानंतर त्याची हार्डकॉपी (ऑनलाईन अर्जाची छापील प्रत) तसेच आवश्यक कागदपत्रे समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे सादर करणे आवश्यक आहे.

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन श्री.सचिन कवले,सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव यांनी केले आहे.

## उमरगा येथे सोन्याचे दागिणे, टॅब व रोखरकमेची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी संजिवनी हरिदास साळुंके, वय ४० वर्षे, रा. काळा मठ पतंगे रोड उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२६.१०.२५ रोजी ०२.०० ते ०३.०० वा. सु. तोडून आत प्रवेश करुन कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने, टॅब व रोख रक्कम ९०,००० असा एकुण १,२५,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संजिवनी साळुंके यांनी दि.२७.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५(अ), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव(प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२७ ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २९९ कारवाया करुन २,१५,३०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## भाजपा प्रयत्नवादी!

राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. ह्या महत्वाच्या निवडणुका समजल्या जातात कारण राजकारणाचा मुळ पाया हा ग्रामीण भागात आहे. ज्यांचे ग्रामीण भागात वर्चस्व आहे त्यांना सहज मुंबई व दिल्ली सर करता येऊ शकते. त्यात मुंबई महानगरपालिकेची निवडणुक होणार आहे. ती भाजपा कोणत्याही परिस्थितीत आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न असणार आहे. त्यामुळे केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांचा महाराष्ट्रात वाढते दौरे होत आहेत. त्यांनी नुकतेच मुंबईत दौऱ्यात महाराष्ट्रात भाजपला आता कोणत्याही कुबड्यांची गरज उरलेली नसून स्वबळावर मजबूत पक्ष म्हणून उभा आहे, असे परखड मत व्यक्त केले. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विरोधकांना नेस्तनाबूत करा की दुर्बिणीतून ते दृष्टीस पडता कामा नयेत, असा मंत्र शहा यांनी कार्यकर्त्यांना दिला. कार्यकर्त्यास त्यांनी प्रशिक्षणच दिले. राज्यात भाजपला कुबड्यांची गरज उरलेली नाही, हे शहांचे सूचक वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांना उद्देशून होते का, यावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू होणे स्वाभाविक आहे. कारण २०२९ ला राज्यात भाजप स्वबळावर सत्तेत येईल, असे विधान गेल्या वर्षी अमित शहा यांनी केले होते. शहा यांच्या विधानाची प्रतिक्रिया उमटताच सहकारी किंवा मित्रपक्ष म्हणजे कुबड्या नव्हेत, असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. भाजपच्या चर्चगेट येथील कार्यालयाचे भूमिपूजन शहा यांच्या हस्ते झाले. त्या वेळी शहा यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्यासह भाजपचे सर्व मंत्री, आमदार, खासदार या वेळी उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ता मिळवून ट्रिपल इंजिन सरकार सत्तेवर आले पाहिजे, असे शहा यांनी स्पष्ट केले. भाजपने नेहमीच नीतीच्या आधारे राजकारणात कार्य करून देशातील नागरिकांच्या हितासाठी कठोर संघर्ष केला. राज्यात भाजप चौथ्या क्रमांकावर होता. आता पहिल्या क्रमांकाचा मजबूत पक्ष बनला आहे, असे सांगून शहा म्हणाले, जनसंघानंतर भाजपची स्थापना झाली आणि तेव्हा माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी 'अंधेरा छटेगा, कमल खिलेगा..' असे उद्गार काढले होते. पक्षाच्या वाटचालीत वाजपेयी हे पुढे पंतप्रधान झाले आणि गेली ११ वर्षे नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा विराजमान झाले आहेत. ही पक्षासाठी गौरवाची बाब आहे. महाराष्ट्रातही फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली रालोआ तिसऱ्यांदा सत्तेवर आली आहे. भाजप घराणेशाहीवर चालणारा पक्ष नाही, येथे एक चहावालाही पंतप्रधान होतो. पक्षासाठी समर्पण, तळमळ व नेतृत्वगुण यामुळे नरेंद्र मोदी हे पंतप्रधानपदापर्यंत पोचू शकले आहेत. मीही पक्षाचा एक सामान्य कार्यकर्ता व निवडणूक केंद्र किंवा बूथ प्रमुख होतो. पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करून राष्ट्रीय अध्यक्षपदापर्यंत मी पोचू शकलो. केवळ नेतृत्वगुण आणि कार्यक्षमतेच्या जोरावर पक्षात महत्त्वाच्या पदांवर पोचता येते आणि भाजप असा एकमेव पक्ष आहे, असे शहा यांनी नमूद केले. वास्तविक अमित शहा यांना कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता आणावयाची आहे. त्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. बऱ्याच वेळा काही पक्ष भाजपात विलीन व्हावते असा प्रयत्न केला गेला. राज्यात तसे पाहिले तर भाजपा हा मजबुत पक्ष समजला जातो. विरोधकांची स्थिती तशी मजबुत नाही. भाजपा मिळून एकनाथ शिंदे व अजित पवार यांची ताकद वाढली आहे. काँग्रेस सह शरद पवार किंवा उद्धव ठाकरे यांची संख्याबळ कमी आहे. तीन आकडी संख्याबळ होऊ शकत नाही. त्यामुळे तसे पाहिले तर एकमेकांना एक दुसऱ्याची गरज आहे. त्यामुळे सत्ताधारी एकत्र आहेत. विरोधक एक मिळून सत्ता ताब्यात घेऊ शकत नाही. त्याच प्रमाणे सत्तेपासून दूर गेल्यास स्थिती काय होईल याची कल्पना सर्वांना आहे. त्यामुळे एकमेकावर आवलंबुन असणारे राज्यात पक्ष आहेत. एकनाथ शिंदे असोत किंवा अजित पवार हे जरी सत्तेतून बाहेर पडणे अशक्य वाटते. सत्ता कोणाला नको आहे? सर्वांना सत्ता हवी व सत्तेपासून कोणीही वंचित राहू शकत नाही हेही तितकेच खरे आहे. त्यामुळे भाजपाने अनेक राज्यात सत्ता काबिज केली आहे. आता त्यांना दक्षिणभारतात पाय रोवायाचे आहेत. त्यासाठी बिहारमध्ये भाजपाचे शर्तीचे प्रयत्न सुरु आहेत. भाजपाचा मुख्यमंत्री बनविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. त्यादृष्टिने त्यांची वाटचाल सुरू आहे. मुंबईत केवळ भाजपाचे कार्यालय बांधकाचा शुभारंभ हे एक निमित्त असले तरी त्यांना कार्यकर्त्यांचे संघटन मजबुत करावयाचे आहे. त्यासाठी बुथ मजबुतीसाठी थेट पंतप्रधान मोदीजी यांनी बिहार बुथ प्रमुखांशी संपर्क साधला आहे. एकंदरीत जेथे भाजपा स्वबळावर सत्ता मिळऊ शकत नाही तेथे मित्र पक्षाच्यामदतीने सत्ता हाती घेणे व नंतर स्वळाचा प्रयत्न करणे हा प्रयत्न चालू आहे. भाजपाने नुकताच मुंबई महानगरपालिके संबंधि वक्तव्य केले त्यानुसार ठाणे बाबत एकनाथ शिंदे निर्णय घेतील मात्र मुंबई ही एकतर्फी भाजपाची असेल असेच होते. त्यामुळे भाजपाला सर्वत्र आपलीच सत्ता हवी आहे. त्याच प्रमाणे त्यांनी विरोकांबाबत केलेले वक्तव्य विचार करायाला लावणारे आहे. तसे देशात काँग्रेस पक्षाची स्थिती समाधानाची नाही. त्यामुळे त्यांच्यावर घराणेशाहीचा आरोप होतो. आज जरी राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे असले तरी त्यांच्यावर लक्ष राहुल व प्रियंका गांधी यांचे आहे हे कार्यकर्ते जाणून आहेत. भाजपात तसे नसले तरी भाजपा जपून पावले टाकत आला आहे. राजकारण म्हटले की, घराणेशाही आली. ती राखू शकत नाही. बिहार मध्ये काय दिसून येत आहे. राजकारण व घराणेशाही ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे भाजपा विविध पैलूचा वापर करून आपली पकड मजबुत करीत आहे. काही झाले तरी महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता स्थापने त्यांचे स्वप्न आहे ते पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे चुकीचे नाही. यदाकदाचित अगामी काळात ते स्वप्न पुर्णही होऊ शकेल.

# काळजी आणि समर्थन : मानवी संवेदनांचा सामाजिक पाया

२९ ऑक्टोबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' (International Day of Care and Support) म्हणून जाहीर केला आहे. २०२३ साली प्रथमच या दिवसाची घोषणा करण्यात आली आणि यामागचा उद्देश असा की, 'काळजी' (Care) आणि 'समर्थन' (Support) या मानवी जीवनातील मूलभूत पण अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या क्षेत्रांना जागतिक स्तरावर ओळख, मान्यता आणि धोरणात्मक प्राधान्य मिळावे. आजचा हा दिवस फक्त एक प्रतीकात्मक उत्सव नाही, तर तो मानवतेच्या अस्तित्वाचा, समाजाच्या एकतेचा आणि मानवी विकासाचा पाया असलेल्या काळजीच्या मूल्यांचा सामाजिक आराखडा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर काळजी आणि समर्थन ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या रचनेतील सर्वात महत्त्वाची सांस्कृतिक, आर्थिक व भावनिक संस्था आहे. समाजशास्त्रात एमिल दुर्खीम यांनी मांडलेले 'सामाजिक ऐक्य' (Social Solidarity) हे संकल्पनात्मक तत्त्व सांगते की प्रत्येक समाज टिकून राहण्यासाठी सदस्यांमधील नैतिक जबाबदारी, सहकार्य आणि परस्पर आदर आवश्यक असतो. काळजी आणि समर्थन ही या सामाजिक ऐक्याचीच व्यावहारिक रूपे आहेत. आपण जेव्हा दुसऱ्याच्या आरोग्याची, दुःखाची, वृद्धापकाळाची, अपंगत्वाची किंवा बालकांच्या संगोपनाची जबाबदारी घेतो, तेव्हा आपण समाजाच्या नैतिक आरोग्याला बळ देतो. दुर्खीमप्रमाणे, समाज हे केवळ कायद्याने किंवा शासनाने चालत नाही; ते चालते ते सामाजिक मूल्यांवर, आणि काळजी ही त्यातील सर्वात महत्त्वाची मूल्यव्यवस्था आहे.

इतिहासात पाहिले तर काळजीची संकल्पना मानवी जीवनात आदिम समाजापासून आहे. एकत्र कुटुंब व्यवस्था, गावसमाजातील परस्पर साहाय्य प्रणाली, धार्मिक दानसंस्था या सर्व काळजीच्या सामाजिक संस्थाच होत्या. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर आणि आधुनिकतेच्या प्रवाहात, घरगुती क्षेत्रातील काळजीचे काम हळूहळू आर्थिक मूल्यांशिवाय, अदृश्य व अवमूल्यित झाले. विशेषतः स्त्रिया या काळजीच्या कामात गुंतलेल्या राहिल्या, आणि या कामाला स्वाभाविक मानले गेले. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे 'लिंगाधारित श्रम विभाजन' म्हणून ओळखले जाते. स्त्रीवादी समाजशास्त्रज्ञ आर्ली होच्सचाइल्ड (Arlie Hochschild) यांनी त्यांच्या "The Managed Heart' या ग्रंथात "Emotional Labour' ही संकल्पना मांडली. त्यांनी दाखवून दिले की स्त्रिया फक्त शारीरिकच नव्हे, तर भावनिक श्रम देखील सतत करतात, काळजी घेणे, समजून घेणे, सहानुभूती दाखवणे हे सर्व त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. परंतु या श्रमाचे ना आर्थिक मूल्यमापन होते, ना सामाजिक सन्मान मिळतो. याच पार्श्र्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' स्थापन करताना जगभरातील काळजी क्षेत्रातील असमानता आणि अवमूल्यन दूर करण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. UN Resolution -/RES/78/220 (2023) नुसार, काळजी आणि समर्थन क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे, कामगार हक्कांचे संरक्षण करणे, आणि लिंगभाव समानतेला चालना देणे हे या दिनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जागतिक कामगार संघटना - २०२२) च्या "Care at Work" अहवालानुसार, जगभरात सुमारे ३७७ दशलक्ष लोक काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यापैकी ७६ टक्के महिला आहेत. परंतु त्यांना मिळणारे वेतन, सुरक्षा आणि सामाजिक मान्यता अत्यल्प आहे.

भारतातील वास्तवही फार वेगळे नाही. घरगुती मदतनीस, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, वृद्ध व अपंगांच्या निगेसाठी काम करणाऱ्या महिला या सर्वजणी काळजी क्षेत्राचे अदृश्य आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कामामुळे समाजाची आरोग्यव्यवस्था, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य टिकून आहे, तरीही त्यांचे श्रम 'सेवा' म्हणून पाहिले जातात, 'काम' म्हणून नव्हे. अमर्त्य सेन यांनी त्यांच्या Capability Approach मध्ये म्हटले आहे की व्यक्तीची क्षमता वाढवण्यासाठी समाजाला आधार आणि काळजी देणारी रचना आवश्यक आहे. जर समाजाने काळजीला प्राधान्य दिले नाही, तर विकास केवळ आकड्यांत मर्यादित राहतो, मानवी जीवनाच्या गुणवत्तेपर्यंत पोहोचत नाही. समाजशास्त्रज्ञ पियरे बोरदियू (Pierre Bourdieu) यांच्या Social Capital संकल्पनेनुसार, समाजात परस्पर विश्र्वास, सहकार्य आणि सामंजस्य या घटकांमुळे सामाजिक भांडवल तयार होते. काळजी आणि समर्थन हे या सामाजिक भांडवलाचे मूळ आहे. ज्या समाजात काळजीचा अभाव आहे, तिथे तुटलेली नाती, एकाकीपणा आणि सामाजिक तणाव वाढतो. वृद्ध व्यक्तींना, अपंगांना किंवा आजारी लोकांना दुर्लक्षित करणारा समाज हा केवळ असंवेदनशीलच नाही, तर सामाजिकदृष्ट्या दुर्बलही ठरतो. म्हणून काळजी ही केवळ वैयक्तिक कृती नसून ती समाजाच्या स्थैर्याचा, समावेशकतेचा आणि मानवतेचा पाया आहे.

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत "Care Economy' ही एक नवी संकल्पना उदयास आली आहे. ही अर्थव्यवस्था त्या सर्व सेवांवर आधारित आहे ज्या लोकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणासाठी आवश्यक आहेत. जसे की आरोग्यसेवा, बालसंगोपन, वृद्धांची देखभाल, शिक्षण, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक कार्य. UN Women (२०२३) च्या अहवालानुसार, जर देशांनी काळजी क्षेत्रात फक्त २ टक्के GDP इतकी गुंतवणूक केली, तर पुढील दशकात कोट्यवधी नवीन रोजगार निर्माण होऊ शकतात. म्हणजेच, काळजी आणि समर्थन हे आर्थिक विकासाचेही साधन आहे. कोविड-१९ च्या काळात काळजी क्षेत्राचे खरे महत्त्व जगाने अनुभवले. डॉक्टर, नर्स, साफसफाई कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, स्वयंसेवक यांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता समाजाला जिवंत ठेवले. पण या काळात त्यांना ज्या प्रकारे कमी वेतन, असुरक्षितता आणि थकवा सहन करावा लागला, त्यातून समाजातील काळजीच्या असमानतेचे चित्र समोर आले. ही महामारी एक आरसा होती, ज्यात आपल्याला दिसले की समाजाला चालवणारी खरी शक्ती 'काळजी'च आहे, आणि तिच्याशिवाय विकास, प्रगती, तंत्रज्ञान हे सर्व रिकामे आहेत.

काळजी आणि समर्थन या संकल्पना समाजशास्त्रीयदृष्ट्या केवळ व्यक्तींमध्ये नव्हे, तर पिढ्यांमध्येही लागू होतात. वृद्धांचा सन्मान, बालकांचे संगोपन, अपंगत्वाचा स्वीकार, पर्यावरणाची काळजी ही सर्व पिढ्यानपिढ्यांची जबाबदारी आहे. इको-फेमिनिस्ट वंदना शिवा (Vandana Shiva) यांनी दाखवून दिले की स्त्रिया आणि निसर्ग या दोघांनाही काळजीच्या भावनेशी जोडले गेले आहे; म्हणून पर्यावरण संवर्धन, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक समता हे तिन्ही एकमेकांशी निगडित आहेत. काळजी म्हणजे केवळ व्यक्तीची नाही, तर पृथ्वीचीही जबाबदारी घेणे आवश्यक आहे. भारतीय सांस्कृतिक परंपरेत सेवा, ममता, दया, सहाय्य, करुणा ही मूल्ये काळजीच्या संस्कृतीचा भाग आहेत. या तत्त्वात सर्व जीवांची काळजी घेण्याची भावना अंतर्भूत आहे. परंतु दुर्दैवाने, आधुनिक काळात या मूल्यांचा प्रत्यक्ष सामाजिक आचरणात अभाव दिसतो. वृद्धाश्रमात राहणारे पालक, दुर्लक्षित अपंग नागरिक, मानसिक आरोग्याविषयी असलेला कलंक हे सर्व काळजीच्या संस्कृतीच्या क्षीणतेचे प्रतीक आहेत. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टीने काळजी ही नव्याने जागविण्याची गरज आहे. काळजी आणि समर्थन यांचे सामाजिक संस्थात्मकरण म्हणजेच धोरणात्मक पातळीवर त्यांना स्थान देणे. भारतात राष्ट्रीय आरोग्य मोहिमा, वृद्ध आरोग्य मिशन, बालविकास योजना, दिव्यांग कल्याण योजना, मानसिक आरोग्य धोरण अशा अनेक योजना काळजीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. मात्र या योजनांमध्ये कार्यरत असलेल्या महिलांच्या सन्मान, वेतन आणि सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. काळजी कामगारांना ILO Convention १८९ अंतर्गत हक्क देणे, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, आणि प्रशिक्षण या बाबी सरकारच्या प्राधान्यक्रमात याव्यात.

आजच्या डिजिटल समाजात काळजीचे स्वरूपही बदलले आहे. टेलिहेल्थ, ई-काउंसिलिंग, ऑनलाइन सपोर्ट नेटवर्क्स या नव्या माध्यमांमुळे काळजीचा आवाका वाढला असला तरी, मानवी स्पर्श हरवण्याची भीतीही निर्माण झाली आहे. समाजशास्त्रज्ञ झिग्मुंट बाऊमन (Zygmunt Bauman) यांनी "Liquid Modernity' मध्ये म्हटले आहे की आधुनिक समाजात नाती द्रवरूप झाली आहेत, म्हणजेच स्थिरता, बांधिलकी आणि सहानुभूती कमी झाली आहे. म्हणून काळजीची नवी संस्कृती उभारण्यासाठी डिजिटल जगातही मानवी संवेदना जपणे आवश्यक आहे. 'आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन' आपल्याला स्मरण करून देतो की काळजी हा विकासाचा पाया आहे. जेव्हा एक समाज आपल्या सर्वात दुर्बल घटकांची काळजी घेतो, तेव्हा तो खरोखर प्रगत ठरतो. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात कुटुंब, शिक्षण, आरोग्य, कामकाज, राजकारण, पर्यावरण यांची काळजी आणि समर्थन ही केंद्रस्थानी असली पाहिजेत. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे, तर काळजी ही मानवी नातेसंबंधांची सामाजिक संस्था (Social Institution of Human Relations) आहे; ती तुटली, तर समाजाचे मूल्यतंत्रच ढासळते.

शेवटी, काळजी आणि समर्थन म्हणजे केवळ भावनिक क्रिया नाही, तर ती एक सामाजिक, आर्थिक आणि नैतिक गुंतवणूक आहे. काळजी घेणारा समाज हा केवळ सभ्यच नव्हे, तर सशक्त, समावेशक आणि संवेदनशील समाज असतो. म्हणूनच आजच्या या दिवसाचे महत्त्व असे की आपण काळजीला दया म्हणून नव्हे, तर सामाजिक न्याय म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक माणूस दुसऱ्याच्या कल्याणाची जबाबदारी घेईल, प्रत्येक संस्था मानवी सन्मानाचे रक्षण करेल, आणि प्रत्येक शासन काळजी क्षेत्राला प्राधान्य देईल तेव्हा तो दिवसच मानवतेचा खरा उत्सव ठरेल.



**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**समाजशास्त्राचे अभ्यासक**
**मो. - ९९६०१०३५८२**

# महावितरणच्या झटपट योजनेचा उद्योजकांना लाभ




**मुंबई/प्रतिनिधी :** घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक अशा सर्व वीज ग्राहकांना गरजेनुसार वीजवापर वाढविण्यासाठी महावितरणने झटपट स्वयंचलित परवानगी योजना राबविल्यामुळे राज्यातील ४,१६४ वीज ग्राहकांनी सुमारे एक महिन्यात २२ मेगावॅट क्षमता वाढवून घेतली. यामध्ये २४६० औद्योगिक वीज ग्राहकांचा समावेश असून दिवाळीपूर्वी मागणीनुसार उत्पादन वाढविण्यास त्यांना मदत झाली.

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, वीज ग्राहकांना अधिकाधिक सहजपणे सेवा मिळण्यासाठी प्रक्रियेत बदल करण्याची सूचना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यानुसार 'इज ऑफ लिव्हिंग'च्या सूत्रानुसार महावितरणने वीज ग्राहकांसाठी मंजूर भार वाढविण्यासाठी (लोड एनहान्समेंट) एक स्वयंचलित व्यवस्था सुरू केली आहे.

या योजनेमध्ये ग्राहक घरबसल्या महावितरणच्या मोबाईल ॲप्लिकेशन किंवा वेबसाईटवर अर्ज सादर करून आणि योग्य शुल्क भरून आपला मंजूर भार वाढवून घेऊ शकतात. ग्राहकाने शुल्क भरल्यानंतर ४८ तासात त्याला परवानगी असलेला मंजूर भार वाढवून दिला जातो.


महावितरणने ही सुविधा २६ सप्टेंबर रोजी सुरू केली. महिनाभरात राज्यातील ४,१६४ ग्राहकांनी नव्या सुविधेचा लाभ घेतला. त्यामध्ये सर्वाधिक २,४६० औद्योगिक वीज ग्राहक आहेत. घरगुती ग्राहकांची संख्या ९४२ असून ५०९ व्यावसायिक ग्राहकांनी सुविधेचा लाभ घेतला. याखेरीज २५३ अन्य ग्राहकांनाही लाभ झाला.

वीज ग्राहकांना महावितरणकडून कनेक्शन देताना त्यांच्या मागणीनुसार वीज वापराबाबतची क्षमता निश्चित केली जाते, त्याला मंजूर भार म्हणतात. औद्योगिक ग्राहकांना उत्पादनात वाढ होत असेल किंवा अधिक क्षमतेची यंत्र सामुग्री वापरायची असेल तर अधिक भार मंजूर करून घ्यावा लागतो. सामान्यतः घरगुती वीज ग्राहकांचा मंजूर भार दोन ते पाच किलोवॅट इतका असतो. ग्राहकांना एअर कंडिशनिंगसारख्या सुविधा बसविण्यासाठी भार वाढवून घ्यावा लागतो. महावितरणने सुरू केलेल्या नव्या सुविधेमुळे ग्राहकांना घरबसल्या ऑनलाईन सेवा उपलब्ध झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने गेल्या साडेतीन वर्षात वीज वितरण जाळे अधिक मजबूत केले आहे. तसेच ग्राहकांच्या वाढत्या गरजेनुसार वीज उपलब्ध होण्यासाठी वीज खरेदी करार केले आहेत. त्यामुळे महावितरण ग्राहकांच्या मागणीनुसार तातडीने अधिक भार मंजूर करू शकत आहे.

महावितरणच्या राज्यभरातील वीज ग्राहकांसाठी १ जुलैपासून नवीन वीजदर रचना लागू झाली आहे. प्रथमच सर्व प्रवर्गातील वीज ग्राहकांच्या वीज दरात कपात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना वीज वापरासाठी दरामध्ये अतिरिक्त सवलतही देण्यात येत आहे. त्याचा लाभ घेऊन अनेक वीज ग्राहकांचा वीज वापर वाढला आहे. त्यासाठी त्यांना त्यांच्या कनेक्शनसाठीचा भार वाढवून घेणे उपयुक्त ठरत आहे.

# उन्हाळ्यात फिट आणि हेल्दी राहायचे असेल तर इन्फ्लुएन्सर सुमन पहुजाच्या ५ टिप्स फॉलो करा



आपण सर्वजण तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यासाठी विविध उपाय करत असतो. यासाठी आपण चांगले अन्न खातो, पुरेशी झोप घेतो आणि तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करतो. पण निरोगी राहण्यासाठी तुम्हाला तुमच्या जीवनशैलीत ऋतुमानानुसार बदल करणे आवश्यक आहे. सध्या उन्हाळा सुरू असून, कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले आहेत. उष्णता, सूर्यप्रकाश आणि घाम यामुळे डिहायड्रेशनची समस्या जाणवू शकते. त्यामुळे थकवा, अशक्तपणा आणि डोकेदुखी यांसारख्या समस्या तुम्हाला सतावू लागतात. इतकेच नाही तर उष्मा आणि सूर्यप्रकाशामुळे त्वचेशी संबंधित समस्याही उद्भवू लागतात. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात फिट आणि हेल्दी राहण्यासाठी काही खास टिप्स फॉलो कराव्यात. इन्फ्लुएन्सर सुमन पाहुजा यांच्याकडून जाणून घेऊया की उन्हाळ्यात तंदुरुस्त आणि निरोगी कसे राहायचे

शरीराला थंड ठेवणाऱ्या गोष्टी खा

उन्हाळ्यात शरीर थंड ठेवणे खूप गरजेचे असते. यासाठी भरपूर पाणी प्या.

उन्हाळ्यात दररोज ३-४ लिटर पाणी प्या.

हंगामी फळांचे सेवन करा.

फळांचे डिटॉक्स वॉटर बनवून प्या. यासाठी २ लिटर पाण्यात फळे २-३ तास भिजत ठेवावीत. त्यानंतर दिवसभर हे पाणी प्यायला ठेवा.

शरीर थंड ठेवण्यासाठी न्याहारीनंतर १-२ तासांनी सफरचंदाचा रस प्या.

असा असावा डाएट प्लान

उन्हाळ्यात जड नाश्ता करायला हवा.

मधल्या वेळेत बिस्किटे वगैरे खाऊ नका. यामध्ये तुम्ही फळे, नारळ पाणी किंवा काकडी इत्यादींचे सेवन करू शकता.

दुपारचे जेवण आणि नाश्ता हलका ठेवा. यामुळे झोप येणार नाही. तुम्हाला बरे वाटेल.

स्नॅक्समध्ये तुम्ही अननसाच्या सालीचा चहा पिऊ शकता. याशिवाय तुम्ही डाळिंब किंवा लिंबाच्या सालीचा चहाही पिऊ शकता.

रात्रीच्या जेवणात तुम्ही स्मूदी, शेक किंवा सूप पिऊ शकता. पण जर तुम्ही भारी कसरत करत असाल तर तुम्ही एक रोटी खाऊ शकता.

चांगली झोप घेणे महत्वाची

उन्हाळ्यात तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यासाठी चांगली झोप घेणे खूप गरजेचे आहे. तुम्ही दररोज ७-८ तासांची झोप घेतली पाहिजे. रात्री १० वाजता झोपणे आणि सकाळी ६ वाजता उठणे ही झोपेची सर्वोत्तम वेळ आहे. नीट झोप न घेतल्यास वजन वाढू शकते किंवा कमी होऊ शकते. तुम्हाला अस्वस्थ वाटू शकते.

तणाव कमी करा

तुमचे मानसिक आरोग्य चांगले असेल तर तुम्ही नेहमी तंदुरुस्त आणि निरोगी असाल. पण जर तुम्ही मानसिकदृष्ट्या अस्वस्थ राहिलात तर तुम्ही आजारी पडू शकता. त्याचबरोबर तणावमुक्त राहून तुम्ही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी राहू शकता. हे तुम्हाला चांगली झोप घेण्यास आणि कामावर लक्ष केंद्रित करण्यात मदत करेल.

दुपारचा सूर्यप्रकाश टाळा

उन्हाळ्यात उन्हात राहिल्याने शरीरातील उष्णता वाढते. त्यामुळे उन्हाळ्यात उन्हात जास्त वेळ घालवणे टाळावे. विशेषत:, आपण दुपारचा सूर्यप्रकाश टाळला पाहिजे. दुपारचा सूर्यप्रकाश जास्त हानिकारक असू शकतो. यामुळे पित्त वाढू शकते आणि संबंधित समस्या उद्भवू शकतात.

# घरगुती सोप्या उपचारांनी अंगदुखीला करा बायबाय

दिवसभराच्या ताणतणावपूर्ण कामांमुळे अनेकांना अंगदुखी वा शरीराच्या कांही भागात वेदना होण्याचा त्रास होतो. अशा वेदनांमुळे आरोग्याच्या समस्याही निर्माण होऊ शकतात. त्यामुळे त्यावर वेळीच उपचार करणे गरजेचे असते. वेदनाशामक औषधे वारंवार घेण्याचे दुष्परिणाम होतात. त्यामुळे अंगदुखीवर वेदनाशामक औषधांचा वापर करण्याऐवजी आयुर्वेदात सांगितलेले काही घरगुती उपाय खूपच परिणामकारक ठरतात. कोणते आहेत हे उपाय त्याची ही माहिती



शरीरात कुठेही वेदना होत असतील तरी लवंग व काळी मिरी यांचा चांगला उपयोग होतो. चहा करताना त्यात पाच लवंगा व थोडी मिरी घालून व आले घालून केलेला चहा गरमगरम प्यायलाने खूप आराम वाटतो. तसेच घसा दुखत असेल अथवा अंग दुखत असेल तर अर्धा चमचा हळद १ ग्लासभर दुधातून गरम असताना प्यायलानेही खूप फायदा होतो.

दोन चमचे मोहरीचे तेल त्यात लसणाच्या पाच पाकळ्या टाकून गरम करावे व या तेलाचा मसाज तेल गरम असताना कापडाच्या बोळ्यावर घेऊन जेथे दुखते त्या जागी केल्यानेही वेदना कमी होतात. आल्याचे साल काढून ते गरम करावे व कॉटनच्या कापडात बांधून जेथे वेदना होत असतील तेथे त्याचा १० मिनिटे शेक घ्यावा.

दालचिनी व मध १-१ चमचा कोमट पाण्यात घालून त्याचा मसाज दुर्खया भागावर केल्यानेही आराम मिळतो. तसेच निलगिरी व आल्याची पेस्ट कॉटन कपड्यात बांधून त्याचा शशे घेतल्यासही बरे वाटते. गरम पाण्यात मीठ घालून टॉवेल भिजवून शेक घेणेही खूपच फायद्याचे ठरते. या उपचाराने अंगावर कोठे सूज आली असेल तर तीही कमी होते. विशेषत: पाय दुखत असतील तर हा उपचार खूपच सोपा व परिणामकारक ठरतो.

# निम्म्या देशाची छाननी

देशातल्या एकूण मतदारांपैकी साधारण निम्म्या मतदारांच्या मतदार याद्यांतील नोंदींची सखोल छाननी निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केली. १२ राज्यांतल्या सुमारे ५१ कोटी मतदारांची छाननी या टप्प्यात होणार आहे.
पहिला टप्पा केवळ बिहार राज्याचा झाला (आणि तो बराच गाजला!) निवडणुकीच्या ऐन तोंडावर २४ जून २०२५ रोजी निवडणूक आयोगाने तिथल्या मतदार याद्यांची छाननी जाहीर केली. ऑक्टोबर – नोव्हेंबरदरम्यान तिथे निवडणुका होणार हे आयोगाला माहीत होतं. तरीही त्यांनीही छाननी जाहीर केली आणि स्वतःलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं. विरोधक आधीच मतदानाचे वेगवेगळे आकडे मांडून प्रश्न उपस्थित करत होते. 'वोट चोरी'च्या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाला लक्ष्य करत होते. त्या वातावरणात सगळ्यांचं लक्ष वळवण्यासाठी का होईना, पण आयोगाने या तरतुदीला आव्हान दिलं. हा मुद्दाच नोंद अधिकृत वा अनधिकृत ठरवण्याच्या यादीत वगळावा, अशी त्यांची मागणी होती. त्याची तड कशी लागली, ते समजलं नाही, त्यामुळे, दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वी आयोगाने पहिल्या टप्प्यात उपस्थित झालेले सर्व प्रश्न आणि त्यावर आयोगाने घेतलेली भूमिका आपल्या वेबसाईटवर सुस्पष्टपणे मांडावी; त्यातून पुन्हा कोणाला नवे प्रश्न उपस्थित करण्याची संधी मिळणार नाही, अशी सूचना केली जाते आहे.
या टप्प्यासाठी आयोगाने स्वतःला पुरेसा वेळ दिला आहे, ही समाधानाची बाब आहे. दुसऱ्या टप्प्यात ज्या केंद्रशासित प्रदेशांचा आणि राज्यांचा समावेश आहे, त्यात राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ही मोठी राज्यं आ-हेत. तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल ही विरोधी पक्षांची सरकारं असलेली राज्यं आहेत. या दोन्ही राज्यातले सत्ताधारी पक्ष आणि त्यांचे नेते, म्हणजे तिथले मुख्यमंत्री किती आक्रमक आहेत, याची कल्पना पूर्ण देशाला आहे. बिहारच्या छाननीवेळी विरोधकांनी काही विशिष्ट मतदारांची नावं यादीतून घाऊकरीत्या वगळली जात आहेत, असा आरोप केला होता. पण, छाननी होऊन निवडणुका घोषित झाल्या, तरी त्या तक्रारीचा कोणी पुनरुच्चार केलेला दिसत नाही. तो आरोप किती पोकळ होता, हे यावरून लक्षात येतं. आता तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनीही 'श्रमिक, अनुसूचित जाती, अल्पसंख्याक आणि महिलांची नावं या छाननीच्या माध्यमातून कमी करण्याचा डाव आहे', असा आरोप केला आहे. पश्चिम बंगालमध्ये घुसखोरीचा मुद्दा खूपच संवेदनशील आहे. या छाननीच्या निमित्ताने घुसखोरांची घाऊक प्रमाणात नावं घुसवली जातील किंवा नको असलेल्या जनसमूहांची नावं वगळली जातील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. निवडणूक आयोगाची या दोन्ही राज्यात कसोटी आहे. सर्व पक्षांचा विश्वास प्राप्त करणं आणि सर्वांच्या सहकार्याने देशभर ही छाननी प्रक्रिया पूर्ण करणं हे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या पुढचं आव्हान असणार आहे ते या अर्थानेच.
सशक्त लोकशाहीसाठी निवडणूक याद्यांची छाननी आवश्यकच आहे. त्यात कुणाचंच दुमत नाही. अशी नियमित छाननी साधारण पाच वर्षांतून एकदा होतही असते. पण, त्यात बऱ्याच त्रुटी राहतात, हे सर्वमान्य आहे. या त्रुटी मुख्यतः गटपातळीवरील अधिकाऱ्यांकडून, माहिती संकलकांकडून राहतात. या साध्या छाननीत चुका राहिल्यास संबंधित संकलकाला जालीम शिक्षा होत नाही. त्यामुळे, ही छाननी पुरेशा गांभीर्याने घेतली जात नाही. अनेक मृत व्यक्तींची नावं यादीत तशीच राहतात; तर नवीन म्हणून जी कागदपत्रं सांगितली आहेत, ती बऱ्याच राज्यात महिलांकडे असण्याची शक्यता नाही. महिलांचं शिक्षण किंवा त्यांना नागरिक म्हणून असलेले अधिकार आपल्याकडे गांभीर्याने घेतले जात नाहीत. ती 'लाभार्थी' होण्याची शक्यता असेल आणि संपूर्ण कुटुंबाला त्याचा लाभ होणार असेल, तरच महिलांची कागदपत्रं अद्ययावत केली जातात. अन्यथा, महिलाही त्याबाबत जागरूक नसतात. या शतकात जगात आणि देशातही स्थलांतराची गरज प्रचंड वाढली आहे. हे स्थलांतर मुख्यतः बिकट जगण्याकडून सोप्या जगण्याकडे होत असतं. जे जगणं अवघड म्हणूनच परागंदा होतात,




घाईघाईने ही छाननी जाहीर केली. त्यासाठीचे निकष, कार्यपद्धतीबाबत अंतिम निर्णय झाले नसताना, मार्गदर्शक कार्यप्रणाली तयार नसताना झालेल्या घोषणेमुळे विरोधकांचं फावलं. त्यांनी आयोगाला जागोजागी खिंडीत पकडलं. मतदाराच्या नोंदणीसाठी ग्राह्य धरल्या जाणाऱ्या कागदपत्रात आधार कार्डाचा समावेश असणार की नाही, हा मुद्दा तर सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आयोगाला मान्य करावे लागले. व्यक्तीची नागरिकता मान्य किंवा अमान्य करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला असू शकतो का? हा प्रश्नही त्या छाननी दरम्यान उपस्थित झाला होता. पालकांच्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या वारसांच्या नोंदी अधिकृत ठरविण्याचा मुद्दाही शेवटी न्यायालयातच पोहोचला. बिहारमध्ये अनाथाश्रमात वाढलेल्या अनेक मुलांनी आयोगाच्या नावं आवर्जून नोंदवली जात नाहीत. या छाननीमध्ये होणारे घोळ आणि निवडणुकीआधी मतदान यादीतील नावे वगळण्याची किंवा जोडण्याची जी प्रक्रिया होते, ती पूर्ण विश्वासार्ह नाही. त्यात त्रुटी राहतात आणि त्यामुळेच सखोल छाननीची गरज पडते. सध्या सुरू असलेली सखोल छाननी तब्बल २१ वर्षांनी होते आहे. हेही योग्य नाही. ठरावीक काळाच्या अंतराने मतदार याद्यांची सखोल छाननी झाली पाहिजे. मतदानातले गैरप्रकार टाळले पाहिजेत. सर्वसामान्य माणसाचा लोकशाही राज्यव्यवस्थेवरील विश्वास वाढण्यासाठी हे फार महत्त्वाचं आहे. मतदारयाद्यांची सखोल छाननी करताना आपल्या दे-शातील एकूण समाजरचना, राज्यनिहाय चालीरीती, परंपरांचा विचारही केला पाहिजे. महिला मतदारांची नोंद करण्यासाठी प्रमाण त्यांच्याकडे सगळी अचूक कागदपत्रं असण्याची शक्यता नसते. भटके – विमुक्त, अशिक्षित कुटुंबांचा यादृष्टीने विचार केला पाहिजे. जनगणनेचे आकडे आणि मतदार नोंदणीचे आकडे परस्परांशी कधीच का जुळत नाहीत? याचा विचारही नियोजनाच्या वरिष्ठ पातळीवर झाला पाहिजे. यातली तफावत निघून जाईल, अशी कार्यप्रणाली स्वीकारली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा त्यासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. जे विरोधक मतदार याद्यांत गडबड आहे, म्हणून देशभर टाकू फोडताहेत, तेच मतदार याद्यांच्या सखोल छाननीला आणि दुरुस्तीला विरोध करताना दिसताहेत, यासारखा दुसरा विनोद नसेल!! मतदारांनीच त्यांना आता याबाबत जाब विचारला

# (गुरु वचन): नशिबात असेल तेच मिळेल


एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, मफ्फ्रशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?फ्फ्र तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कम ावतो. त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.
मफ्फ्रअरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त



अन्नवस्त्रापुरताच पैसा आहेफ्फ्र कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, मफ्त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!फ्फ्र
दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

# उपदेशकथा: कुंतीचे मागणे


भारतीय युद्ध संपले होते. धर्मराजाला राज्याभिषेक झाला होता. श्रीकृष्ण द्वारकेला जाण्याचा विचार करू लागला तेव्हा पांडवमाता कुंती त्याला भेटायला आली. श्रीकृष्ण तिला म्हणाला, ङ्घकुंती ! मी आता परत जातो. तुला हवे ते मागून घे.फ्फ्र तेव्हा कुंती म्हणाली, ङ्गगोविंदा ! जीवनामध्ये माझ्यावर पुन्हा पुन्हा संकटे येऊ देत. तू भगवत्स्वरुप आहेस. संकटात वारंवार तुझे दर्शन घडते.फ्फ्र हे मागणे ऐकून श्रीकृष्णाने विचारले. ङ्घअगं, जीवनामध्ये दु:खाचे व विपत्तीचे वरदान कुणी मागतो का? हे तू काय मागतेस?फ्फ्र कुंतीने उत्तर दिले, ङ्घश्रीकृष्णा ! जेव्हा विपत्ती येते तेव्हा तू आमचे रक्षण करण्यास येतोस म्हणून तुझे दर्शन होते. तुझे दर्शन झाले की जीव पुन्हा संसारात रमत नाही पण ते तुझे दर्शन संकटामध्येच होत असते.फ्फ्र आपला मुलगा राजा झाला हे तिने पाहिले. आता विपत्काल हातचा गेला असे तिला वाटले.कथा उपदेश : संकटामध्ये ज्या उत्कटतेने ईश्वराचे स्मरण व चिंतन घडते तसे इतर वेळी होत नाही.



## डॉक्टर टीप्स

### सेक्स लाईफ सुधारण्यासाठी आहाराचा कितपत उपयोग होतो?

तसंच चेरी, ब्लॅकबेरी, ब्लॅककरंट, क्रॅनबेरी, रसबेरी, द्राक्ष, ऑबरगेन आणि लाल पत्ताकोबी यांच्यात आढळणाऱ्या अँथोसायनिनचा उपयोग होऊ शकतो.
ॲफ्रोडिजियाक म्हणजे काय?
अफ्रोडाईट या नावावरून अफ्रोडिजियाक हे नाव प्रचलित झालं. त्यांची विभागणी तीन भागात होऊ शकते. ते म्हणजे, कामेच्छा जागृत करणारे, संभोगक्षम आणि लैंगिक सुखकारक.
पण खरंच अफ्रोडिजियाकमुळे लैंगिक क्षमतेत वाढ होते की नाही हे वैज्ञानिकरीत्या सिद्ध होऊ शकलेलं



नाही.लैंगिक आरोग्याचे तज्ज्ञ असलेले डॉ. क्रिचमन सांगतात, अफ्रोडिजियाक आहार घेणाऱ्या व्यक्तींना फक्त ते काम करत असतील असा विश्वास असतो, म्हणून ते हा आहार घेतात. जर एखादी गोष्ट तुमच्यासाठी उपयोगाची असेल, तर तिचा कशाप्रकारे उपयोग आहे याला महत्त्व नसते.काही पदार्थ आरोग्यदायी आहेत. पण हा आहार घेतल्यानंतर शरीरावर त्याचे परिणाम कशाप्रकारे होतात, याची तपासणी करणंही गरजेचं आहे.

## विनोद




आईने सोनूला विचारले, 'तू इथे ठेवलेली बिस्किटे खाल्लीस का?' सोनू म्हणाला, 'मी एकाला हात लावला नाही.' तेव्हा आई म्हणाली, 'इथे तर एकच शिल्लक आहे.' 'त्यालाच मी हात लावला नाही.' सोनू म्हणाला.

## संदेश

FARHAN & RANCHO
scooty pe Ghumne gaye..
Achanak RANCHO Urr gaya
Q?
Qki

Behti Hawa sa
tha w0
Urti Patang
sa tha W0
Ab Msg Padhna Band Karo Or
RANCHO kahan gaya usey DHUNDO...

## सुविचार




विज्ञानात आत्मज्ञान आले तर सर्वोदय होईल.
– विनोबा भावे

**संस्कृत सुभाषित**

**अधनाद्धि निर्वन्तते ज्ञातयः सुहृदो द्विजा :**
**अपुष्पाद्फलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिण:।।**
**(उद्योगपर्व, अध्याय ७२, ोक २० महाभारत)अर्थ :** ज्याप्रमाणे पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात, त्याप्रमाणे दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. मिठाई तयार करणारा
३. ज्वारीची वाळलेली ताटे, गाय-बैलाचे खाद्य
५. सवाद्य, गाजावाजा करीत
९. सुमारे दोन मैल
११. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
१३. तंबूवजा घर
१४. रसपूर्ण, रसाळ
१७. लोकनाट्यातील कलाकार
१९. हिंदीत प्रवास
२१. दरवाजा
२२. पाताळ
२४. बोकड
२६. कोवळी फांदी
२७. हिमालय सर करणारा शेर्पा
२८. द्रव्य, किंमत
३०. न्हाव्याची हत्याराची पिशवी, पडशी
३२. युद्धातील वीरश्रींची घोषणा
३५. समुद्राच्या लाटांचा आवाज
३६. गीत गाणे
३७. धातुचा धागा
३८. व्यापारातील नुकसान, फटका, हादरा
३९. मोठी टोपली, फलक
४१. आयुष्य
४३. घर
४५. ढाक्क्याचे प्रसिद्ध कापड
४८. कडक व चिवट
४९. एकाक्षरी प्रश्न
५१. अघळपघळ, स्वैर
५३. हिस्सा
५४. संथपणे
५५. माफी
५६. संतोष, आनंद
५७. प्रतिबिंब दाखविणारी काच
५८. अंगावरील बारीक केस
६०. केस काळे करण्याचे साधन
६१. आवर घालणारी वादी
६२. सैल झालेले (वस्त्र)
६४. आश्चर्याने थक्क होणे
६७. लक्ष्मीपती
६८. सन्मानाची रक्कम, ७०. चांदणी
७२. धमनी
७४. गप्प बसणे
७६. इमारतीतील घर, फ्लॅटला मराठी शब्द
७८. हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्राव
७९. दागदागिने
८०. रड्या मनुष्य

## उभे शब्द

१. सहस्रवेळा
२. चणचण
४. लहान मुलांची गाणी
५. भांडणे, चर्चा
६. शोध
७. गालाची बाजू
८. तात्पर्य, अर्थ, सार
१०. सदोदित
१२. आठवड्याचा दिवस
१५. अखेरीस
१६. विष्णूचा एक अवतार
१८. श्रीमंत
२०. विहीरीतून पाणी काढण्याचे यंत्र
२३. समुद्र
२४. तोंड खाली घातलेला
२५. सततचे नामस्मरण
२९. प्रेम, माया
३१. समीक्षक
३३. सीमा
३४. जयपराजय
३६. कपाळ फुटणे
४०. हिंमत
४२. समुद्रातील अग्नी
४४. निराश
४५. फुलेफळे यांचे शेत
४६. युद्ध
४७. प्रेम, माया, लाड
४८. पुष्कळ
५०. भर दिवसा
५२. जास्तीत जास्त व कमीत कमी
५४. तात्पर्य
५६. अखंडीतपणा
५७. आंब्यातील द्रव
५९. देश, जमीन
६३. फळातील मगज
६५. अवधान, लक्ष
६६. ठेकेदार
६९. टक्कर
७१. फळातील द्रव
७२. होकारच्या विरुद्ध
७३. सहाय्य
७४. मजा, गंमत
७५. मेहरबानी
७७. मेहरबानी
७७. दु:ख, खेद, सल
७८. लुसलुशीत

## आडवे उत्तर

१.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६.समाधान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रकमपात ८०.रडतराऊत

## उभे उत्तर

१.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अधोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### परिस्थिती चिंताजनक? बिसीसीआय श्रेयच्या कुटुंबाला ऑस्ट्रेलियाला पाठवणार?

**दिल्ली**–ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यरला गंभीर दुखापत झाली. अय्यरने ॲलेक्स कॅरीचा कॅच पकडण्यासाठी बरचं अंतर धावत कापले आणि शेवटी डाइव्ह टाकून एक उत्तम कॅच घेतला. मात्र या प्रयत्नात त्याच्या बरगडीला गंभीर दुखापत झाली. त्याला अंतर्गत रक्तस्त्राव होत असल्याचं लक्षात आल्यानंतर तातडीने सिडनीमधील रुग्णालयात हलवण्यात आलं. त्यानंतर त्याच्या प्रकृतीबद्दल अनेकांनी चिंता व्यक्त केली असून श्रेयसच्या प्रकृतीबद्दलच्या बऱ्याच बातम्या समोर येत आहेत. श्रेयसची प्रकृती काही काळ अगदी चिंताजनक असल्याने त्याला अतिदक्षता विभागात म्हणजेच आयसीयूमध्येही ठेवण्यात आले होते. मात्र त्याला आयसीयूमधून डिस्चार्ज देण्यात आला असून त्याची प्रकृती आता स्थिर आहे.
बीसीसीआय कुटुंबाला ऑस्ट्रेलिया पाठवण्याच्या तयारीत?
पुढील आठवडाभर श्रेयसचा मुक्काम रुग्णालयातच असेल असं सांगितलं जात आहे. सुरुवातीला असे वृत्त आले होते. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजेच बीसीसीआय अय्यरच्या कुटुंबियांना ऑस्ट्रेलिया नेण्याची व्यवस्था करणार असल्याचंही वृत्त समोर आलं होतं.

***

### 'धोनी'मुळे सुपरहिट, सलमानची फेवरेट सिंगर, स्मृती मानधनासोबत कसे आहे नाते?

मुंबई–भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार ओपनिंग बॅट्समन स्मृती मानधना आणि संगीतकार–दिग्दर्शक पलाश मुच्छल लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. २०१९ पासून डेटिंग करत असलेल्या या जोडीने जुलै २०२४ मध्ये आपल्या नात्याला इंस्टाग्रामवर ऑफिशियल केले होते. आता खुद्द पलाश आणि त्याची बहीण, गायिका पलक मुच्छल यांनी त्यांच्या लग्नाचे संकेत दिले आहेत. शुभंकर मिश्रासोबतच्या पॉडकास्टमध्ये पलकने स्मृतीसोबतच्या नात्यावर खुलासा केला आहे.
स्मृतीसोबत नाते किती घट्ट?
पलक मुच्छलने पत्रकार शुभंकर मिश्रा यांच्याशी बोलताना स्मृती मानधना सोबतचे तिचे नाते किती घट्ट आहे हे सांगितले. पलक म्हणाली, माझ्या आयुष्यातील काही खास नात्यांपैकी स्मृती मानधना सोबतचे नाते मी जपते. ती एक खूप चांगली व्यक्ती आहे. आम्ही दोघी खूर क्लोज आहे. सिस्टर सारखं नातं आमचं आहे, पण एक व्यक्ती म्हणून, वुमन म्हणून आणि आर्टिस्ट म्हणून मला तिचा खूप अभिमान वाटतो. तिने कमी वेळेत खूप काही मिळवलं आहे, असं म्हणत पलकने स्मृतीचं कौतूक देखील केलं.

### श्रेयस अय्यर आयसीयूतून बाहेर, सिडनीत मित्र पोहोचले, कुटुंबीयांकडून तात्काळ व्हिसासाठी अर्ज

नवी दिल्ली–भारताच्या वनडे संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर याला सिडनीच्या हॉस्पिटलच्या आयसीयूमधून बाहेर काढण्यात आलं आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या वनडेत कॅच घेताना श्रेयस अय्यर जखमी झाला होता. बीसीसीआयनं श्रेयस अय्यरची प्रकृती स्थिर असून सुधारत असल्याची माहिती दिली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सिडनी क्रिकेट ग्राऊंडवर तिसरी वनडे २५ ऑक्टोबर रोजी पार पडली होती. ॲलेक्स कॅरीचा कॅच घेताना श्रेयस अय्यर दुखापतग्रस्त झाला होता. ॲलेक्स कॅरी दुखापतग्रस्त झाल्यानंतर त्याला तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.
क्रिकबझनं सूत्रांच्या माहितीनुसार श्रेयस अय्यर धोक्याबाहेर असून रुग्णालयात आणखी काही दिवसांसाठी देखरेखीसाठी दाखल असेल अशी माहिती देण्यात आली आहे. डॉक्टरांकडून श्रेयस अय्यरच्या बरगडीच्या दुखापतीमुळं होणाऱ्या अंतर्गत रक्तश्रावामुळं देखरेख ठेवली जात आहे. श्रेयस अय्यरच्या कुटुंबीयांकडून तातडीच्या व्हिसासाठी अर्ज करण्यात आला आहे. त्या संदर्भातील परवानगी मिळाल्यानंतर कुटुंबीय ऑस्ट्रेलियाला रवाना होतील, अशी माहिती आहे.

***

### हर्षित राणाची जागा जाणार? टीम इंडियात आणखी एका खेळाडूचे पुनरागमन !

मुंबई–टीम इंडियामध्ये आणखी एक वरिष्ठ खेळाडू संघात परतण्याच्या तयारीत असून, त्याच्या पुनरागमनामुळे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरची डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा क्रिकेटविश्वात रंगली आहे. आणि या खेळाडूच्या परतीमुळे परिणामी गंभीरला आपल्या आवडत्या खेळाडूला संघाबाहेर ठेवावं लागू शकतं. रोहित आणि विराटनंतर आता भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आहे. शमी सध्या बंगाल संघाकडून रणजी ट्रॉफी खेळत आहे आणि त्यानं आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. शमीने अलीकडे दोन रणजी सामन्यांत शानदार कामगिरी करत एकूण १५ बळी घेतले आहेत. पहिल्या सामन्यात ७ आणि दुसऱ्या सामन्यात तब्बल ८ विकेट्स. त्याच्या या फॉर्ममुळे आता तो पुन्हा राष्ट्रीय संघात निवडला जाऊ शकतो, अशी चर्चा रंगली आहे. गौतम गंभीर सध्या भारतीय संघात नव्या दमाचे खेळाडू तयार करण्यावर भर देत आहे. तो तरुण गोलंदाजांना संधी देत युवा संघ उभा करण्याच्या प्रयत्नात आहे. परंतु रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या पुनरागमनामुळे आधीच काही युवा खेळाडूंना संघाबाहेर बसावं लागलं.

## भारत-ऑस्ट्रेलिया पहिला ट्वेन्टी-२० सामना आज कॅनबेरात; आक्रमक फलंदाजीची पर्वणी अपेक्षित

कॅनबेरा : जगज्जेता भारत आणि यजमान ऑस्ट्रेलिया हे जागतिक ट्वेन्टी-२० क्रिकेट क्रमवारीतील अव्वल दोन संघ आता समोरासमोर येणार असून पाच सामन्यांच्या मालिकेत चाहत्यांना आक्रमक फलंदाजीची पर्वणी अनुभवायला मिळणे अपेक्षित आहे. या ट्वेन्टी-२० मालिकेतील पहिला सामना आज, बुधवारी ऑस्ट्रेलियाची राजधानी कॅनबेरा येथे खेळवला जाईल.
पुढील वर्षीच्या सुरुवातीला भारतात ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळवली जाणार आहे. या स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने भारत-ऑस्ट्रेलिया मालिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतीय संघाने अलीकडेच आशिया चषक स्पर्धा जिंकून आपली लय दाखवून दिली आहे. गेल्या वर्षी ट्वेन्टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावल्यानंतर भारतीय संघाने या प्रारूपात २७ सामने खेळले असून त्यापैकी तब्बल २२ मध्ये विजय नोंदवला आहे.
दुसरीकडे, याच कालावधीत ऑस्ट्रेलियाने १९ पैकी १६ ट्वेन्टी-२० सामने जिंकण्यात यश मिळवले आहे. दोन्ही संघांत प्रतिभावान युवा खेळाडू आणि गुणवान अनुभवी खेळाडूंचे योग्य मिश्रण आहे. त्यामुळे ही ट्वेन्टी-२० मालिका अत्यंत चुरशीची होणे अपेक्षित आहे.
सलामीवीरांकडे लक्ष
भारत आणि ऑस्ट्रेलिया हे दोन्ही संघ आक्रमक शैलीतील फलंदाजीला




गेल्या वर्षी ट्वेन्टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावल्यानंतर भारतीय संघाने या प्रारूपात २७ सामने खेळले असून त्यापैकी तब्बल २२ मध्ये विजय नोंदवला आहे.दोन्ही संघांत प्रतिभावान युवा खेळाडू आणि गुणवान अनुभवी खेळाडूंचे योग्य मिश्रण आहे.

पसंती देत आहेत. अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड हे 'आयपीएल'मध्ये सनरायजर्स हैदराबादसाठी एकत्रित खेळणारे सलामीवीर आता आपापल्या राष्ट्रीय संघांचे प्रतिनिधित्व करतील. या दोघांचाही पहिल्या चेंडूपासून धोका पत्करण्यात आणि गोलंदाजांवर हल्ला चढवण्यात हातखंडा आहे. त्यामुळे त्यांच्या कामगिरीकडे चाहत्यांचे विशेष लक्ष असेल.भारतासाठी अभिषेकच्या साथीने शुभमन गिल, तर ऑस्ट्रेलियासाठी हेडच्या साथीने कर्णधार मिचेल मार्श सलामीला उतरेल. या जोड्यांवरच आपापल्या संघाला आक्रमक सुरुवात मिळवून देण्याची जबाबदारी असेल. तसेच कॅनबेरा येथील मनुका ओव्हलच्या खेळपट्टीवर चेंडूला अतिरिक्त उसळी मिळते. अशात दोन्ही संघांच्या गोलंदाजांचीही भूमिका महत्त्वाची ठरेल.वेळ : दुपारी १.४५ वा.
थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्टस २, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.
सूर्यकुमारला लय सापडणार?
– सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने गेल्या वर्षभरात ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मात्र, फलंदाज म्हणून सूर्यकुमारला फारसे यश मिळू शकलेले नाही. तो यावर्षी खेळलेल्या १२ आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० सामन्यांत मिळून केवळ १०० धावा करू शकला आहे. यात त्याची सरासरी ११.११ अशी, तर स्ट्राइक रेट १०५.२६ असा आहे.
– सूर्यकुमार फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्ट्यांवर विशेष अडचणीत सापडतो. मात्र, ऑस्ट्रेलियातील खेळपट्ट्यांवर चेंडूला अतिरिक्त उसळी मिळते. अशा खेळपट्ट्यांवर त्याला मागील दिशेला फटके मारणे अधिक सोपे जाईल. त्यामुळे या मालिकेत त्याच्याकडून अधिक चांगल्या कामगिरीची अपेक्षा बाळगली जात आहे.
– आशिया चषकात भारतीय संघ वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव या फिरकी त्रिकुटासह खेळला होता. आता ऑस्ट्रेलियातही हे तिघे एकत्रित खेळण्याचे संकेत सूर्यकुमारने दिले आहेत. मात्र, जायबंदी हार्दिक पंड्याच्या अनुपस्थितीत जसप्रीत बुमराच्या साथीने वेगवान गोलंदाजीची धुरा कोण सांभाळणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. भारताकडे अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा यांचा पर्याय उपलब्ध आहे.संघ–भारत : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, शुभमन गिल, तिलक वर्मा, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), जितेश शर्मा (यष्टिरक्षक), रिंकू सिंह, नितीश रेड्डी, शिवम दुबे, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग, हर्षित राणा. ऑस्ट्रेलिया : मिचेल मार्श (कर्णधार), ट्रॅव्हिस हेड, मॅथ्यू शॉर्ट, जोश इंग्लिस (यष्टिरक्षक), जोश फिलिपे (यष्टिरक्षक), टीम डेव्हिड, मार्कस स्टोइनिस, मिचेल ओवेन, शॉन ॲबट, झेवियर बार्टलेट, नेथन एलिस, जोश हेझलवूड, मॅथ्यू कुनमन, तन्वीर संघा.

## सुजीत कलकलची कुस्तीमध्ये सुवर्णपदकावर नोंदवली मोहोर

**नोवी साद (सर्बिया) :** भारताच्या सुजीत कलकल याने युवा (२३ वर्षांखालील) जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. फ्री-स्टाइल विभागातील ६५ किलो वजनी गटाच्या अंतिम लढतीत सुजीतने उझबेकिस्तानच्या उमिदजोन जालोलोव्ह याच्यावर तांत्रिक वर्चस्वावर १०-० अशी मात केली.
सुजीतने १० गुणांची कमाई करताच पंचांनी लढत थांबवत नियमानुसार त्याला विजयी घोषित केले. त्या वेळी लढतीची दोन मिनिटे शिल्लक होती. या वर्चस्वासह सुजीत गतवर्षीच्या स्पर्धेतील पदकाचा रंग बदलण्यात यशस्वी ठरला. गेल्या स्पर्धेत सुजीत कांस्यपदकाचा मानकरी ठरला होता. आता युवा आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा तो अमन सेहरावत (२०२२) आणि चिराग चिकारा यांच्यानंतर तिसरा भारतीय कुस्तीपटू ठरला आहे.
सुजीतने या वर्षीच्या स्पर्धेत प्रत्येक लढतीत आपले वर्चस्व राखले होते. पहिल्या दोन फेरीत त्याने अनुक्रमे मोल्डोवाचा फियोडोर सेव्दारी आणि पोलंडचा डॉमिनिक याकूब यांच्यावर तांत्रिक आघाडीवरच मात केली होती. उपांत्यपूर्व फेरीत ०-२ अशा पिछाडीनंतर त्याने बशीर मॅगोमेडोव्ह याचा ४-२ असा पराभव केला, मग उपांत्य फेरीत जपानच्या तगड्या युटो निशिऊची याच्यावर ३-२ अशी मात केली.या स्पर्धेत भारताच्या मुलींनी चमकदार कामगिरीसह दहापैकी सात वजनी गटांतून (दोन रौप्य, पाच कांस्य) पदकांची कमाई करून सर्वसाधारण विजेतेपदापर्यंत मजल मारली होती. मुलांना मात्र ग्रीको-रोमन आणि फ्री-स्टाइल अशा दोन विभागांतून केवळ एकाच सुवर्णपदकाची कमाई करता आली. फ्री-स्टाइल विभागात सुजीतचा अपवाद वगळता दोन कुस्तिगीर कांस्यपदकाच्या लढतीत खेळले, पण त्यांना अपयश आले. ग्रीको-रोमन प्रकारात भारताचे सर्व कुस्तिगीर पहिल्याच फेरीत पराभूत झाले.
ऑलिम्पिकसाठी दावेदारः
सुजीतचे हे पहिलेच जागतिक विजेतेपद ठरले. यापूर्वी त्याने २३ वर्षांखालील स्पर्धेत २०२२ आणि २०२५ मध्ये आशियाई विजेतेपद, तर २० वर्षांखालील स्पर्धेत २०२२ मध्येच आशियाई विजेतेपद मिळिवले होते. भारतामध्ये फ्री-स्टाइल प्रकाराच्या ६५ किलो वजनी गटात अनेक वर्षे बजरंग पुनियाने पकड राखली होती. त्यामुळे सुजीतला आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधीसाठी प्रतीक्षा करावी लागली. मात्र आता २०२८ ऑलिम्पिकच्या दृष्टीने त्याच्याकडे संभाव्य पदकविजेता म्हणून पाहिले जात आहे.



## मुलानीची फिरकी प्रभावी; छत्तीसगड विरुद्धच्या अनिर्णित सामन्यात मुंबईला आघाडीचे तीन गुण



वांद्रे कुर्ला संकुल येथील ङ्गएमसीएफशरद पवार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात पहिले तीन दिवस पावसाने अनेकदा व्यत्यय आणला.छत्तीसगड विरुद्धच्या अनिर्णित सामन्यात मुंबईला आघाडीचे तीन गुण

मुंबई : डावखुरा फिरकीपटू शम्स मुलानीच्या (५/५९) प्रभावी माऱ्यामुळे मुंबईला रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील छत्तीसगडविरुद्धच्या अनिर्णित राहिलेल्या सामन्यात पहिल्या डावातील आघाडीचे समाधान लाभले. त्यामुळे मुंबईने तीन गुणांची कमाई केली. या निकालानंतर मुंबईचे दोन सामन्यांत नऊ गुण झाले असून 'ड' गटात त्यांनी अग्रस्थान राखले आहे.वांद्रे कुर्ला संकुल येथील 'एमसीए' शरद पवार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात पहिले तीन दिवस पावसाने अनेकदा व्यत्यय आणला. त्यामुळे बरीच षटके वाया गेली. त्यानंतरही मुंबईने विजयाची संधी निर्माण केली होती. मुंबईच्या ४१६ धावांच्या प्रत्युत्तरात सामन्याच्या अखेरच्या दिवशी छत्तीसगडचा पहिला डाव २१७ धावांवर आटोपला. त्यानंतर मुंबईने प्रतिस्पर्ध्यांना फॉलोऑन दिला. परंतु पहिल्या डावातील अर्धशतकवीर आयुष पांडेने दुसऱ्या डावात १७१ चेंडूंत नाबाद ११७ धावांची खेळी करताना मुंबईला विजयापासून दूर ठेवले. छत्तीसगडची दुसऱ्या डावात ३ बाद २०१ अशी धावसंख्या असताना सामना संपविण्याचा निर्णय घेण्यात आला.
त्याआधी, सामन्याच्या चौथ्या आणि अखेरच्या दिवशी ६ बाद १७६ धावांवरून पुढे खेळणाऱ्या छत्तीसगडचा पहिला डाव २१७ धावांवर संपुष्टात आला. मुलानीने अचूक टप्प्यावर गोलंदाजी करताना छत्तीसगडच्या अखेरच्या चारपैकी तीन फलंदाजांना माघारी धाडले. तर शशांक सिंहचा (३३) अडसर ऑफ-स्पिनर हिमांशू सिंहने दूर केला. मुंबईने रणजी स्पर्धेच्या नव्या हंगामातील पहिल्या लढतीत जम्मू-काश्मीरला पराभूत केले होते. त्यात मुलानीने अनुक्रमे ९१ आणि ४१ धावा करतानाच दोन डावांत मिळून नऊ बळीही मिळवले होते. पाठोपाठ छत्तीसगडविरुद्ध फलंदाजीत ३९ धावा केल्यानंतर त्याने गोलंदाजीत प्रतिस्पर्ध्यांचा निम्मा संघ गारद करत पुन्हा एकदा अष्टपैलू चमक दाखवली.
पहिल्या डावात १५९ धावांची खेळी करणाऱ्या अजिंक्य रहाणेला सामनावीराचा पुरस्कार मिळाला.
संक्षिप्त धावफलक
मुंबई (पहिला डाव) : ४१६
छत्तीसगड (पहिला डाव) : ७६.५ षटकांत सर्वबाद २१७ (आयुष पांडे ५०, शशांक चंद्राकर ४३; शम्स मुलानी ५/५९, हिमांशू सिंह ३/४२, मुशीर खान २/३८)
छत्तीसगड (दुसरा डाव) : ५८ षटकांत ३ बाद २०१ (आयुष पांडे नाबाद ११७, संजीत देसाई २६; मुशीर खान १/३१, हिमांशू सिंह १/६५, शम्स मुलानी १/८१)

## मोहम्मद शमीचा सलग दुसऱ्या रणजी सामन्यात धमाका, गुजरात विरुद्ध ८ विकेट घेतल्या

### आगरकरसह निवड समितीचे टेन्शन वाढले



कोलकाता–भारतीय संघान मायदेशात वेस्ट इंडिज विरुद्ध दोन कसोटी सामने खेळले तर ऑस्ट्रेलिया विरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची वनडे मालिका पार पडली. या मालिकेत भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला संधी मिळाली नव्हती. मात्र,रणजी स्पर्धेत मोहम्मद शमीने बंगालकडून खेळताना गुजरात विरुद्ध ८ विकेट घेतल्या आहेत.यामुळे बंगालने रणजी स्पर्धेत दुसरा सामना जिंकला. शमीनं दोन्ही सामन्यात मिळून १५ विकेट घेतल्या आहेत आता दक्षिण आफ्रिके विरुद्धच्या कसोटी सामन्यांसाठी मोहम्मद शमीला संधी मिळणार का हे पाहावं लागेल. निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर मोहम्मद शमी फिट नसल्यानं त्याची निवड झाली नसल्याचं म्हटलं होतं. त्यानंतर मोहम्मद शमीनं तो जर फिट नसेल तर



त्यानं बंगालकडून देखील खेळलं नाही पाहिजे, असं म्हटलं होतं. जर चार दिवसांचे सामने खेळू शकतो तर ५० ओव्हरची मॅच खेळू शकतो असं वक्तव्य मोहम्मद शमीने केले होते.
मोहम्मद शमीने बंगालकडून गुजरात विरुद्ध खेळताना ८ विकेट घेतल्या आहेत. शमीनं पहिल्या डावात ३ आणि दुसऱ्या डावात ५ विकेट घेतल्या. ही मॅच बंगालनं १४१ धावांनी जिंकली. पहिल्यांदा फलंदाजी करताना बंगालनं २७९ धावा केल्या होत्या. गुजरातचा संघ पहिल्या डावात १६७ धावांवर बाद झाला. मोहम्मद शमीनं पहिल्या डावात गुजरातच्या तीन विकेट घेतला. तर, बंगालनं दुसऱ्या डावात ८ बाद २१४ धावांवर डाव घोषित केला. यामुळं गुजरातला विजयासाठी ३२७ धावा करायच्या होत्या. मोहम्मद शमीनं दुसऱ्या डावात गुजरातच्या ५ विकेट घेतल्या. यामुळं गुजरातचा संघ १८५ धावांवर बाद झाला. प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार गुजरातच्या शाहबाज अहमदला दिला गेला. त्यानं मॅचमध्ये दोन्ही डावात मिळून ९ विकेट घेतल्या. त्यानं पहिल्या डावात बंगालच्या ६ आणि दुसऱ्या डावात ३ विकेट घेतल्या.
शमीच्या २ मॅचमध्ये १५ विकेट
रणजी ट्रॉफी २०२५ च्या ग्रुप स्टेजमध्ये बंगालनं सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकले आहेत.१२ गुणांसह क गटात पश्चिम बंगाल तिसऱ्या स्थानावर आहे. मोहम्मद शमीनं उत्तराखंड विरुद्ध पहिल्या डावात ३ आणि दुसऱ्या डावात ४ विकेट घेतल्या होत्या. तर, गुजरात विरुद्ध शमीनं पहिल्या डावात ३ आणि दुसऱ्या डावात ५ विकेट घेतल्या.
भारत ऑस्ट्रेलियातील टी २० मालिका संपल्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी, वनडे आणि टी २० मालिका खेळणार आहे. त्यासाठी भारतीय संघातील दावेदारी शमीने भक्कम केली आहे. दरम्यान निवड समिती सदस्य आर. पी. सिंग याने मोहम्मद शमीची भेट घेतल्याचे देखील कळतेय.

# फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

## * १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन * तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांचा समावेश

**मुंबई/प्रतिनिधी** : वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह – 'मुंबई क्लायमेट वीक' ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई' या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते. यावेळी 'मुंबई क्लायमेट वीक' च्या लोगोचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फूड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट विकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत. ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच ''मुंबई क्लायमेट वीक'' कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे. यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे.

''मुंबई क्लायमेट वीक'' कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले.



तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले. मुंबई क्लायमेट वीकचा भर अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी सक्षमता या तीन प्रमुख विषयांवर असेल. न्याय, नवोन्मेष आणि वित्तीय दृष्टीकोनातून हे विषय सखोलपणे मांडले जातील.

'प्रोजेक्ट मुंबई'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी कार्यक्रमाबद्दल माहिती देताना सांगितले की, ''मुंबई क्लायमेट वीक हा महाराष्ट्र आणि भारतासाठी एक ऐतिहासिक टप्पा असणार आहे. वातावरणीय बदलाला तोंड देण्यासाठी लोकसहभागावर आधारित असे शाश्वत आणि समावेशक उपाय या परिषदेतील मंथनातून तयार होतील.''

या उपक्रमाचे नॉलेज पार्टनर मॉनिटर डिलॉईट असणार असून क्लायमेट ग्रुप, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिस्ट्यूट (इंडिया), एव्हरसोर्स, एचटी पारेख फाउंडेशन, युनिसेफ, शक्ती फाउंडेशन, रेनमॅटर फाउंडेशन, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या संस्था यात सहभागी होणार आहेत. मुख्यमंत्री कार्यालयातील यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे, प्रोजेक्ट मुंबईचे सल्लागार मंडळ सदस्य रिधम देसाई, जलज दाणी आदी यावेळी उपस्थित होते.

# पर्यटन विकास योजनेतून १९ गावातील विकास कामासाठी आ. कराड यांच्या प्रयत्नातून २ कोटी रूपयाचा निधी मंजूर

**लातूर/प्रतिनिधी** : प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १९ गावातील विविध विकास कामासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने त्या त्या गावातील मंदिर परिसराचा विकास होणार असल्याने ग्रामस्थातून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावात राज्याच्या पर्यटन विकास योजनेअंतर्गत निधी मिळावा यासाठी राज्याचे पर्यटन मंत्री ना. शंभूराजे देसाई यांच्याकडे भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील १९ गावाअंतर्गत विविध कामासाठी तब्बल २ कोटी रुपयांचा निधी राज्याच्या पर्यटन विभागाने २८ ऑक्टोबर



२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी दिली आहे.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघातील १९ गावात, लातूर तालुक्यातील १०, रेणापूर तालुक्यातील ६ आणि भादा सर्कल मधील ३ गावाचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका – भडी काशी विश्वेश्वर मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, नागझरी नागनाथ मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कासारखेडा महादेवदास महाराज मठ परिसर विकास करणे १० लक्ष, गांजूर लंकेश्वर महाराज मंदिर परिसर विकसीत करणे १० लक्ष, निवळी ज्योतिबा मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कानडी बोरगाव सिद्धेश्वर मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, अंकोली बिरुदेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कारसा विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, सोनवती खंडोबा मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, सारसा गणेशनाथ मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, रेणापूर तालुक्यातील – कोसगाव महादेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, तत्तापूर महादेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, दवणगाव दवनेश्वर मंदिर परिसर विकसित करणे २० लक्ष, खरोळा विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, कामखेडा महादेव मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, माणूसमारवाडी बालाजी हनुमान देवस्थान मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष आणि भादा सर्कल मधील बोरगाव न. माऊली मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष, टाका भीमाशंकर मंदिर देवस्थान परिसर विकसित करणे १० लक्ष, उटी बु. जगदंबा देवी मंदिर परिसर विकसित करणे १० लक्ष रुपये याप्रमाणे एकूण २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून १९ गावातील मंदिर, देवस्थान परिसरातील विविध विकास कामासाठी निधी मिळवून दिल्याबद्दल त्यांचे त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## लातूर: बुधोडा येथे ट्रव्हल्स सायकलचा भीषण अपघात ! सायकलस्वार महारुद्र ताडमाडगे यांचा जागीच मृत्यू

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील बुधोडा गावाजवळ आज सकाळी साडेसहा ते सातच्या दरम्यान एक अत्यंत दुःखद घटना घडली. येथे ट्रॅव्हल्स आणि सायकल पकल यांच्या झालेल्या भीषण धडकेत, सायकलस्वार महारुद्र ताडमाडगे यांचा जागीच मृत्यू झाला आहे. ४७ वर्षीय महारुद्र ताडमाडगे हे मूळचे बामणी (जि. लातूर) येथील रहिवासी असून ते लातूरच्या बोधनगरमध्ये राहत होते आणि शहरातील एमआयटी दवाखान्यात काम करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, महारुद्र ताडमाडगे हे दररोजप्रमाणे सायकलवरून लातूरकडे जात असताना, बुधोडा येथील सर्विस रोडवर हा अपघात झाला. औसाकडून लातूरकडे जाणाऱ्या ट्रॅव्हल्सने सायकलस्वाराला धडक दिली. ट्रॅव्हल्स चालकाने वाचवण्याचा प्रयत्न आहे. केला, मात्र सायकलस्वार दुर्दैवाने ट्रॅव्हल्सच्या मागच्या टायरखाली आले.

घटनेची माहिती मिळताच औसा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघातग्रस्त ट्रॅव्हल्स आणि सायकल औसा पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले आहेत. या अपघातामुळे ताडमाडगे कुटुंबीयांवर मोठा आघात झाला असून त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. औसा पोलीस या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहेत.

# जिल्ह्यातील शिस्तप्रिय नेतृत्व, दिलीपराव देशमुख – सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

**लातूर/प्रतिनिधी** : वलांडी–लातूर जिल्ह्यातील अनेक नेतृत्वा पैकी शिस्तप्रिय नेतृत्व म्हणून ओळख असणारे दिलीपराव देशमुख आहेत असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी तळेगाव तालुका देवनी येथे केले.

ते तळेगाव तालुका देवनी येथील जागृती साखर कारखान्याच्या चौदाव्या गळीत हंगामा प्रसंगी तसेच दिलीपराव देशमुख यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार प्रसंगी बोलत होते.







यावेळी व्यासपीठावर दिलीपरावजी देशमुख, सुवर्णाताई देशमुख, माजी आमदार वैजनाथदादा शिंदे, माजी आमदार धर्माजी सोनकवडे, जिल्हा बँक संचालक अशोकराव पाटील निलंगेकर, बसवराज पाटील नागराळकर, यशवंतराव पाटील, आबासाहेब पाटील सेलूकर, डी.एन दादा शेळके, मल्लिकार्जुन मानकरी सावकार, विठ्ठलराव माकणे, भगवानराव पाटील तळेगावकर, विजयकुमार पाटील, निवृत्तीराव कांबळे, मोहित भाई शेख, शिवाजीराव केंद्रे, अभयदादा साळुंखे, अभिजीत देशमुख, धनंजय तात्या देशमुख, दिलीपराव माने, प्रमोद जाधव, पृथ्वीराज शिरसाट, सचिन पाटील, व्हाईस चेअरमन लक्ष्मणराव मोरे, सूर्यकांत कवी, विठ्ठलराव पाटील, ऍड किरण जाधव, संभाजीराव सूळ, हनुमंत जाधव, अनुप शेळके, अरविंद भातंबरे, सोनू डगवाले, रामदास पवार, गणेश येवले, सर्व संचालक मंडळ, शेतकरी, सभासद, पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की, सहकार म्हणजे संस्था नव्हे तर संस्कार असून, सर्वांच्या सहकार्यामुळे जागृती कारखाना उभा राहिला आहे. लातूर जिल्हा बँक विविध बँकेना कर्ज देते त्यामुळे बँकेचा आलेख हा सतत चढत राहिलेला आहे . मला घडवण्यामध्ये दिलीपराव देशमुख यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्यामुळेच मी राज्याचा सहकार मंत्री म्हणून काम करत आहे. कारखान्याच्या माध्यमातून सर्वांगीण विकास होतो. दिलीपराव देशमुख यांची सर्वांना सहकार्याची भूमिका असते. शेतकऱ्यांनी चिंता करण्याची गरज नाही सरकार आपल्या पूर्ण पाठीशी असून सरकारने शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांनी ऊस तोडणीसाठी गडबड करू नये, नोंदणी वेळेवर करून घ्यावी तसेच शेतीमध्ये ए आय तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहनही सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी बोलताना केले.

सर्वप्रथम जागृती कारखान्याच्या दहा हार्वेस्टर चे पूजन सहकार मंत्री नामदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कारखान्याच्या वतीने दिलीपराव देशमुख यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त विशेष मानपत्र देऊन सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते दिलीपराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अभय साळुंखे, भगवानराव पाटील तळेगावकर, विठ्ठल माकणे, यशवंत पाटील, शिवाजी केंद्रे, डी एन शेळके, बसवराज पाटील नागराळकर, प्रा. बी व्ही मोतीपवळे, अशोकराव पाटील निलंगेकर यांनी ए यांनी समायोजित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक कारखान्याचे उपाध्यक्ष लक्ष्मण मोरे यांनी केले. अध्यक्ष समारोप व सत्कारला उत्तर सत्कारमूर्ती दिलीपराव देशमुख यांनी दिले.

# तालमणी डॉ.राम बोरगावकर कलाभूषण पुरस्काराने सन्मानित

**लातूर/प्रतिनिधी** : येथील मराठवाडा संगीत कला अकादमी व रिसर्च सेंटर चे अध्यक्ष सुप्रसिध्द तबलावादक तालमणी डॉ.राम बोरगावकर यांना विश्वकर्मा ग्रामीण शैक्षणिक विकास संस्था विष्णुपुरी,नांदेड आणि एन. आर. डी. फूड प्रॉडक्ट्स तपसे चिंचोली यांच्या वतीने कलाभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार ज्येष्ठ संगीतज्ञ तालमणी डॉ.राम बोरगावकर यांच्या संगीत क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल तसेच संगीत क्षेत्रातील साधना, संगीत कलेच्या प्रचार आणि प्रसारासाठी केलेले कार्य, यासोबतच अखंड संगीत यज्ञाच्या माध्यमातून उदयोन्मुख कलावंतांना घडविणाऱ्या आणि त्यांना व्यासपीठ मिळवून देणारे प्राचार्य डॉ.राम बोरगावकर यांना कलाभूषण पुरस्कार पुण्यश्लोक अहिल्यादेवी





होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे, माजी कुलगुरू मधुकरजी गायकवाड, गोविंद नांदेडे, प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार, मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे संचालक डॉ. गणेश चंदनशिवे, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, डॉ. दिगंबर नेटके यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप होते. '' कलाभूषण पुरस्कार '' वितरण सोहळा लातूर येथील दयानंद सांस्कृतिक सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत येथे पार पडला.

त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल द्वारकादास शामकुमारचे संचालक श्री. तुकाराम पाटील, ॲड.दासराव शिरुरे, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्राचार्य बाबुराव जाधव, प्राचार्य निलेश राजेमाने, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा.विश्वनाथ स्वामी, प्राचार्य डॉ. सुदाम पवार यांचेसह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.





शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ३२ वर्षांनंतर पुन्हा भेट - महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हायस्कूल, १९९३ च्या बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

धाराशिव (प्रतिनिधी)- चला पुन्हा एकदा लहान होऊ या, एक दिवसाची शाळा शिकू या, आठवणींचा सोहळा... या भावनिक संदेशासह महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हायस्कूलच्या १९९३ च्या बॅचचा स्नेहमेळावा दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी, रविवारी शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. तब्बल ३२ वर्षांनंतर माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षकवर्ग आणि मित्रमंडळी पुन्हा एकत्र आल्याने परिसरात आनंदाचे आणि आठवणींचे वातावरण निर्माण झाले.



या स्नेहमेळाव्यासाठी काही माजी विद्यार्थी परदेशातून विशेषतः भारतात दाखल झाले, ही या सोहळ्याची विशेष बाब ठरली. जुन्या आठवणी, वर्गातील खोड्या, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेच्या भिंतींनी पाहिलेल्या बालमैत्रीच्या क्षणांना उजाळा देताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक बदडे सर, तसेच मुंडे सर, देशमुख एन.आर., वरपे व्ही.पी., प्रतापराव हंगरगेकर, शहाजीराव भोसले, हरिदास रोचकरी, पद्माकर मोकाशी, गुलाबराव पाटील, माणिकराव किर्गत, अंगदराव खोत, पांडुरंग सरडे, एस.एन. कदम, हरिश्चंद्र आवारे, संदिपान काळे, श्रीमती उषाताई विठ्ठलराव चव्हाण, वनमाला जाधव, द्रौपदी शेवाळे, मिनाताई पाटील, मंदाताई बल्लाळ यांची उपस्थिती लाभली.

स्नेहमेळावा निमित्त स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर जुन्या मित्रांना भेटल्याचा आनंद आणि गुरूजनांप्रती कृतज्ञतेची भावना स्पष्ट दिसत होती.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सतीश घोगरे, प्रसाद खामकर, सचिन घोडके, अमोल साठे, शाम जहागीरदार, प्रशांत हंगरगेकर, ॲड. शितल डोके, सौ. संगिता धर्माधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

या स्नेहमेळाव्याने एक दिवसाची शाळा शिकू या या संकल्पनेला न्याय देत १९९३ च्या बॅचने पुन्हा एकदा बालपण अनुभवले आणि शाळा केवळ इमारत नाही, ती भावना आहे हे पुन्हा अधोरेखित केले.

# प्रा. यशवंत चंदनशिवे यांना राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार जाहीर; बालकुमार साहित्य संमेलनात होणार सन्मान

उमरगा(प्रतिनिधी)- अखिल भारतीय शब्दमुद्रा साहित्य परिषद, पालघर व मराठी बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर याच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार प्रा. यशवंत चंदनशिवे यांच्या व्यथा...! जगण्यावर प्रेम करणाऱ्या माणसांची' या कथासंग्रहास जाहीर झाला आहे. आंबुलगा ( वि ) ता. निलंगा, जि. लातूर येथे होणाऱ्या पहिल्या राजस्तरीय बालकुमार साहित्य संमेलनात ३० ऑक्टोबर रोजी चंदनशिवे यांचा गौरव करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला गोविंद गोडबोले ( माजी आकाशवाणी अधिकारी, कोल्हापूर ), कवी डॉ. बालाजी मदन इंगळे, माजी खाजदार, साहित्यिक डॉ. सुनील गायकवाड, कांदबरीकार डॉ. श्रीकांत पाटील (अध्यक्ष - मराठी बालकुमार साहित्य सभा, कोल्हापूर ), साहित्यिक, समीक्षक प्रा. डॉ. बालाजी मन्नाडे ( अध्यक्ष - अखिल भारतीय शब्दमुद्रा साहित्य परिषद, पालघर) या मान्यवरांची उपस्थिती राहणार असून, त्यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.

प्रा. यशवंत चंदनशिवे यांचे महाविद्यालयीन जीवनापासून लेखन सुरू आहे. अनेक वृत्तपत्रात, दिवाळी अंकात त्यांच्या कथा, कविता, लेख, प्रकाशित झालेत. विवेक साहित्य कला मंडळाच्या माध्यमातून त्यांनी साहित्य चळवळ राबवली आहे. आताही ते महाराष्ट्र साहित्य संघाच्या माध्यमातून ते साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत.

चंदनशिवे यांचा यापूर्वी मुंबई पत्रकार संघाचा पत्रलेखन पुरस्कार, काव्यमित्र, पुणे यांचा राज्यस्तरीय साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे पुरस्काराने गौरव झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल कवी आदित्य जाधव, नितीन पवार, भारती चव्हाण, दत्तात्रय पवार, नयन राजमाने, पंढरी बनसोडे, दत्तात्रय मानगुडे, तात्या नंदने, शुभांगी पाटील, विद्या कोथलकर, सुधीर श्रेये, रवींद्र भोजणे, प्रमोद उबाले, प्रा. विजयकुमार जगताप, प्रा. शिवकुमार आडसुळे, प्रा. नामदेव जाधव, प्रा. डॉ. राम जाधव यांनी अभिनंदन केले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना क्रमांक: ०८-२०२५-जीएसयू-इलेक्ट-टीआरडी**

सीपीएम, गति शक्ती, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत. **कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात डीडी-एसयूआर विभागातील इलेक्ट्रिक ट्रॅक्शन सिस्टमचे १x२५ केव्ही ते २x२५ केव्ही ट्रॅक्शन सिस्टममध्ये अपग्रेडेशन करणे जेणेकरून ३००० मेट्रिक टन लोडिंग लक्ष्य पूर्ण होईल - ओएचई सुधारणा काम. (पुनर्निमंत्रण) **कामाची अंदाजे किंमत:** रु. १३७,९४,८६,२६१.९५/- **बयाना रक्कम:** रु. ७०,४७,४००.००/- **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** २४ (चोवीस) महिने. **www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** २१.११.२०२५ रोजी १५:०० वाजेपर्यंत **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ** २१.११.२०२५ रोजी १५:३० वाजेनंतर. **वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in. टीप:** संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल वेबसाइटसाठी: **www.ireps.gov.in** 67

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है


# डॉ. आंबेडकर विद्यापीठ उपकेंद्रासमोर पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी: भीम आर्मीचे दोन दिवसीय उपोषण




धाराशिव (प्रतिनिधी) - डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव येथे डॉ आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा तर कमान उभारण्यात यावी. तसेच कसबे तडवळे येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यात यावी या मागणीसाठी भीम आर्मीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि.२८ ऑक्टोबरपासून दोन दिवशीय उपोषण सुरू करण्यात आले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभा करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू, प्राचार्य, शिक्षक आणि भीम आर्मी भारत इयत्ता मिशन यांची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दालनामध्ये बैठक लावण्यात यावी. तसेच कसबे तडवळा येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे बांधकाम तात्काळ करण्यात यावे, या मागण्यांसाठी भीम आर्मीच्यावतीने उपोषण सुरू करण्यात आलेले आहे.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष रणजीत बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश गायकवाड, आजाद समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष किशोर बनसोडे, भीम आर्मीचे तालुका अध्यक्ष विश्वनाथ कांबळे, कळम तालुका उपाध्यक्ष धनराज नाईकवाडे, सल्लागार सुरेश कांबळे, मुकेश मोटे, जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ गायकवाड, धाराशिव शहराध्यक्ष विश्वा पेठे, उपाध्यक्ष फयाज पठाण, जिल्हा सचिव लखन ओव्हाळ आदी सहभागी झाले आहेत.

# कार्य, जनतेचा कौल बघूनच उमेदवारी देणार बैठकीत आ. अभिजित पाटील यांचे प्रतिपादन




करकंब(प्रतिनिधी)-आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ज्या उमेदवारांचे कार्य, जनतेचा कौल पाहूनच उमेदवारी दिली जाईल, असे प्रतिपादन आमदार अभिजित पाटील यांनी महाविकास आघाडीच्या विचारविनिमय बैठकीत केले.

याप्रसंगी मनसेचे नेते दिलीप धोत्रे, राष्ट्रवादीचे (शरद) जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगर, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत, माजी नगराध्यक्ष नागेश काका भोसले, शिवसेनेचे (ठाकरे) जिल्हाध्यक्ष संभाजीराजे शिंदे, काँग्रेसचे संपर्कप्रमुख काझी, संतोष नेहतराव, मनसेचे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, अनिल बागल आदी उपस्थित होते. आमदार अभिजित पाटील म्हणाले की, महाविकास आघाडीतील सर्वजण एकसंघ राहून आगामी निवडणुका लढवतील व त्यात यशस्वी होतील. जो उमेदवार निवडून येण्यायोग्य आहे, त्यासाठी ताकद लावली जाईल. श्रेष्ठींचा निर्णय विचारात घेतला जाईल. वरिष्ठ पातळीवर जो निर्णय होईल, त्यानुसार पक्षाच्या चिन्हावर की इतर चिन्हावर निवडणूक लढवायची हे महाविकास आघाडी मिळून ठरवणार आहे, असेही त्यांनी सांगितले.


**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गासाठी ३२९५ कोटी

## सुधारित आराखड्यास मंत्रिमंडळाचा हिरवा कंदिल : आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे) -धाराशिव रेल्वेस्थानक पूर्वी प्रस्तावित होते, त्यापेक्षा तिप्पट मोठे होणार आहे. पर्यायी रेल्वेमार्ग उभारला जाणार आहे. प्रवाशांसह कर्मचारी आणि अधिकार्यांकरिता अद्ययावत सोयी-सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. रस्त्यांच्या वरून आणि खालून जाणार्या पुलांची संख्याही वाढविण्यात आली आहे. सोलापूर शहरातील जमीन रेल्वेमार्गासाठी संपादन करण्याकरिता तेथील सध्या प्रचलित असलेले दर गृहित धरण्यात येणार आहेत. वरील सगळ्या गोष्टींचा एकत्रित विचार करून धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गासाठी ३२९५ कोटी रूपयांच्या सुधारीत आराखड्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. धाराशिवला जंक्शन रेल्वे स्थानक होणार, अर्थकारणाला गतीही मिळणार आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे तीर्थक्षेत्र आता लवकरच रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर झळकणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाढीव प्रकल्प किंमतीनुसार रेल्वे बोर्डाने निधीची तरतूद करावी, अशी मागणी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. त्यानुसार रेल्वे बोर्डाने ५० टक्के तरतूद केल्यानंतर उर्वरित ५० टक्के राज्य हिश्याचा वाटा देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार ३२९५ कोटी रूपयांच्या सुधारित आराखड्यावर राज्य मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले आहे. एकूण ८४.४४ किलोमीटर लांबीच्या या रेल्वेमार्गासाठी ९०४ कोटी ९२ लाख रूपयांची मंजुरी देण्यात आली होती. आता त्यामध्ये तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. आपण सातत्याने विधीमंडळात हा विषय लावून धरला होता. ठाकरे सरकारच्या कालावधीत तत्कालीन परिवहन मंत्री अनिल परब यांनी तातडीने या महत्वपूर्ण रेल्वेमार्गासाठी राज्याचा ५० टक्के हिस्सा देण्याचा पावले उचलावीत, असा पाठपुरावाही आपण केला होता. परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. आपल्या महायुती सरकारने सुधारीत आराखड्यानुसार ५० टक्के राज्य हिश्याचा वाटा देण्यास हिरवा कंदिल दाखवला आहे. त्यामुळे कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे तीर्थक्षेत्र असलेले तुळजापूर रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर आता झळकणार आहे. त्याचबरोबर तुळजापूर ते सोलापूर या टप्प्यातील रेल्वेमार्गाच्या कामालाही गती मिळणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मुख्य रेल्वेस्थानकाची इमारत चार हजार चौरस मीटरवरून आता १२ हजार ६३० चौरस मीटर होणार आहे. एकंदरीत रेल्वे स्थानकाची इमारत तिप्पट मोठी होणार आहे. वेगात जाणार्या जलदगती रेल्वेगाड्यांना तत्काळ मार्ग मिळावा यासाठी आवश्यक असणारी पर्यायी व्यवस्थाही उभारली जात आहे. यार्डाच्या आवश्यकतेनुसार मोठ्या लांबीची लूपलाईनही अंथरली जाणार आहे. पूर्वी रस्त्याखालून जाणार्या पुलांची संख्या २० होती. आता त्यात वाढ करण्यात आली असून रस्त्याखालून रेल्वेमार्गासाठी ३१ पूल उभारले जाणार आहेत. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील सर्वात महत्वाच्या पुलाची लांबी वाढविण्यात आली आहे. ३८५ मीटरऐवजी हा पूल ३९९ मीटर एवढा लांब असणार आहे. प्रवाशांसाठी अनेक महत्वपूर्ण सोयी-सुविधांचा या आराखड्यात अंतर्भाव करण्यात आला आहे. पथमार्ग, दादरा, प्लॅटफॉर्म यासह जमिनीखाली आणि जमिनीच्या वर पाण्याच्या मोठ्या टाक्या उभारल्या जाणार आहे. त्यासाठीही दुप्पट जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. रेल्वे अधिकारी आणि कर्मचार्यांच्या निवासस्थानांची संख्या ३४२ वरून ३७३ करण्यात आली आहे. त्यासाठी सुधारित आराखड्यानुसार राज्य मंत्रिमंडळाने ३२९५ कोटी रूपयास मान्यता दिली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

पुर्वीच्या सरकारने राज्य हिश्श्याचा ५० टक्के वाटा न दिल्यामुळेच धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाचे काम अडीच वर्षे रखडले होते. त्यामुळे प्रकल्प किंमतीतही तब्बल ११७.४९ टक्के वाढ झाली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ९०४.९२ कोटी रूपयांच्या मूळ प्रकल्प किंमत असलेल्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर या रेल्वेमार्गासाठी आता ३२९५ कोटी रूपये लागणार आहेत. त्याचवेळी ठाकरे सरकारने हे पैसे उपलबध करून दिले असते तर रेल्वेमार्ग कदाचित आतापर्यंत पूर्णही झाला असता. यापूर्वी राज्य सरकारने मूळ प्रकल्प किमतीनुसार ४५० कोटी रुपयांचा राज्य हिश्श्याचा वाटा दिलेला आहे. आता वाढीव २००० कोटींपैकी १००० कोटींचा राज्य वाटा देण्यासही राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. ठाकरे सरकारमुळे रखडलेल्या रेल्वेमार्गाला आपल्या महायुती सरकारमुळे आता गती मिळाली असून धाराशिव जिल्ह्यातील जनतेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व अजितदादा पवार यांचे आपण आभार मानतो असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649